दरमहा १ तारखेस ऑनलाईन प्रकाशित होणारे डिजिटल मासिक.....

बरडशेवाळा ता. हदगांव बीटाचा अभिनव व उपयुक्त शैक्षणिक उपक्रम

चिंचगव्हाण, पळसा, व भानेगांव केंद्राअंतर्गत ( बरडशेवाळा बीट अंतर्गत)

## डिजिटल ई मासिक

# ज्ञानसंस्कार

वर्ष - पहिले
अंक - दुसरा
ऑगस्ट
२०२०

## लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती निमित्त विनम्र अभिवादन





संकल्पना व निर्मिती
सुपलकर एस बी
ता. हदगांव

## * प्रेरणा *

**श्रीमती. आठवले मॅडम**

प्राचार्य, डायट नांदेड

**श्री. दिग्रसकर साहेब**

शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प. नांदेड

**श्री. मठपती साहेब**

उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प. नांदेड

**श्री. ससाणे साहेब**

गटशिक्षणाधिकारी, पं. समिती हदगांव

## * मार्गदर्शन व निर्मिती सहकार्य *

**श्रीमती. आडगांवकर मॅडम**

शिविअ बीट बरडशेवाळा

## * समन्वय व सहकार्य *

**श्री. गोडघासे सर**

केंद्रप्रमुख चिंचगव्हाण

**श्री. शेख सर**

केंद्रप्रमुख पळसा

**श्री. सोनटक्के सर**

केंद्रप्रमुख भानेगांव

**श्री. बेग सर**

पदो. मुअ केप्राशा चिंचगव्हाण

**श्री. माने सर**

पदो. मुअ केप्राशा पळसा

**श्री. पवळे सर**

केंद्रिय मुअ केप्राशा भानेगांव

## * निर्मिती समन्वय व सहकार्य *

| केंद्र - चिंचगव्हाण | केंद्र - पळसा | केंद्र - भानेगांव |
|---|---|---|
| श्री. बेग सर | श्री. माने सर | श्री. पवळे सर |
| पदो. मुअ केप्राशा चिंचगव्हाण | पदो. मुअ केप्राशा पळसा | केंद्रिय मुअ केप्राशा भानेगांव |
| श्री. शिंदे सर | श्री. सूर्यवंशी सर | श्री. जामगडे सर |
| पदो. मुअ प्राशा शिबदरा | पदो. मुअ प्राशा बरडशेवाळा | पदो. मुअ प्राशा करोडी |
| श्री. बिडला सर | श्री. मुळावकर सर | श्री. दंडवते सर |
| पदो. मुअ प्राशा माळझरा | पदो. मुअ प्राशा पिंगळी | पदो. मुअ प्राशा अंबाळा |
| श्रीमती. भिसे मॅडम | श्री. कदम सर | श्री. चव्हाण सर |
| पदो. मुअ प्राशा पिंपरखेड | पदो. मुअ प्राशा कवाना | मुअ प्राशा धानोरा |
| श्री. चव्हाण सर | श्रीमती. कदरे मॅडम | श्री. राठोड सर |
| मुअ प्राशा करमोडी | मुअ प्राशा केदारगुडा | मुअ प्राशा उंचेगांव (खु.) |
| श्रीमती. ओतारी मॅडम | श्री. सूर्यवंशी सर | श्री. आमेटवाड सर |
| मुअ प्राशा बामणी | मुअ प्राशा गारगव्हाण | मुअ प्राशा रुई (धा.) |
| श्रीमती. ताटे मॅडम | श्री. गोगे सर | श्री. पतंगे सर |
| मुअ प्राशा जगापूर | मुअ प्राशा पांगरी तांडा | मुअ प्राशा गोजेगांव |
| श्री. स्वामी सर | श्री. कदम एम एस सर | श्री. आंडगे सर |
| मुअ प्राशा गारगोटी | मुअ प्राशा बरडशेवाळा कॅंप | मुअ प्राशा बेलगव्हाण |
| श्री. तांबोळे सर | श्री. खिराडे सर | श्री. डोरले सर |
| मुअ प्राशा शिबदरा (नआ) | मुअ प्राशा बामणीतांडा | मुअ प्राशा शिवपूरी |
| श्री. नवहारे सर | श्री. बेरळीकर सर | श्री. दहेकर सर |
| मुअ प्राशा खरबी | मुअ प्राशा निमटोक | मुअ प्राशा वाकोडा |
| श्री. देशमूखे सर | श्री. दस्तुरकर सर | श्री. हिंगडे सर |
| मुअ प्राशा कार्ला | मुअ प्राशा चेंडकापूर | मुअ प्राशा अंबाळा (न.) |
| श्री. जाधवर सर | श्री. बागल सर | श्री. नरवाडे सर |
| मुअ प्राशा पोतली तांडा | मुअ प्राशा किनाळा | मुअ प्राशा आडा |
| तसेच अंतर्गत सर्व शाळांचे शिक्षक बंधू भगिनी | तसेच अंतर्गत सर्व शाळांचे शिक्षक बंधू भगिनी | तसेच अंतर्गत सर्व शाळांचे शिक्षक बंधू भगिनी |

* प्रकाशक *

बरडशेवाळा शिक्षण विभाग,

पं.स. हदगांव जि. नांदेड

* प्रकाशन सल्लागार समिती *

केंद्र - चिंचगव्हाण ता. हदगांव जि. नांदेड

केंद्र - पळसा ता. हदगांव जि. नांदेड

केंद्र - भानेगांव ता. हदगांव जि. नांदेड

* मुखपृष्ठ व अंतरंग मांडणी व सजावट *

श्री. सुपलकर एस. बी. प्रा.शा. शिबदरा म 8380977961

## शुभ संदेश



**मा. श्री. मठपती डी. एस.**
**उपशक्षणाधिकारी**
**जिल्हा परिषद नांदेड तथा**
**गटशक्षणाधिकारी**
**पं.स. भोकर**

## अभिनंदनीय शुभेच्छा संदेश...!

सर्व प्रथम हदगांव तालुक्यातील बरडशेवाळा विभागाने संपूर्ण जिल्हयात ज्ञानसंस्कार इ मासिक निर्मितीमध्ये पुढाकार घेतल्याबददल त्या संपूर्ण टीमचे अभिनंदन !

मागील महिन्यात झूम मिटींगच्या माध्यमातून या मासिकाच्या उदघाटन समारंभास आम्ही उपस्थित होतो. मा. शिक्षणाधिकारी महोदयांच्या हस्ते या मासिकाचे उदघाटन करण्यात आले. हदगांव तालुक्यातील बरडशेवाळा या बीटने हा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. ही खरंच कौतुकाची बाब आहे. विदयार्थी हित डोळयासमोर ठेवून शिक्षक व विदयार्थी यांचे लेखन साहित्य सर्वांसमोर आणण्याचा हा नांदेड जिल्हयातील बहूदा पहिलाच प्रयोग असावा.

कोविड १९ च्या परिस्थितीत सर्व काही बंद असताना देखील शिक्षकांना व विदयार्थ्यांना अध्ययनरत ठेवून त्यांच्या लेखन वाचनाचा छंद जोपासण्याचा हा उपक्रम स्तुत्य असा आहे. आजच्या घडीला नांदेड जिल्हयातील सर्व शिक्षक तंत्रस्नेही प्रशिक्षित झालेले असून ऑनलाईन स्वरुपात सोशल माध्यमातून विदयार्थ्यांना अभ्यास पाठवणे, त्यांच्या अभ्यासातील प्रगतीचा आढावा घेणे याबाबी करत आहेत. निश्चितच पुढील काळात पण काही दिवस या पदधतीने शिक्षण प्रणाली अशी सुरु राहिल असे वाटते. तेंव्हा अशा पदधतीचे मासिके शिक्षण क्षेत्रात सर्वांना दिशादर्शक ठरणारे आहेत. या स्वरुपाची मासिके इतर तालुक्यात व इतर विभागात पण त्या त्या तंत्रस्नेही शिक्षकांच्या मदतीने सुरु केल्यास वेळेचा सदुपयोग होईल, विदयार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल व सर्वांना एक मुक्त व्यासपीठ मिळेल यात शंका नाही.

हदगाव तालुक्यातील या अनोख्या आणि स्तुत्य उपक्रमास आणि सर्व टीम ला भावी वाटचाली साठी हार्दिक शुभेच्छा ....!

**श्री. मठपती डी. एस.**
**उपशक्षणाधिकारी**
**जिल्हा परिषद नांदेड तथा**
**गटशक्षणाधिकारी**
**पं.स. भोकर**

## शुभ संदेश



**श्री. जोंधळे पी. जे.**
**केंद्रप्रमुख**
**केंद्र - हळदा ता. भोकर**

## अभिनंदनीय शुभेच्छा संदेश...!

हदगांव तालुक्यातील बरडशेवाळा विभागाचे ज्ञानसंस्कार इ मासिक नुकतेच वाचण्यात आले. मासिक पाहून या उपक्रमाच्या उपयुक्ततेबददल दोन शब्द लिहावे वाटले यासाठी हा लेख प्रपंच...

सर्व प्रथम हदगाव तालुक्यातील बरडशेवाळा बीटातील ज्ञानसंस्कार मासिकाच्या संपूर्ण टीमला शुभेच्छा... तसेच श्री.सुपलकर सरांचे विशेष अभिनंदन... त्यांनी या उपक्रमास प्रत्यक्षात आणण्याचे ठरवले. विदयार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी आज पारंपारिक शिक्षणाबरोबरच वेगवेगळया संकल्पना, तंत्र वापरुन, त्या क्षमता, तंत्र प्रत्येक शिक्षकाने आत्मसात करुन विदयार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने हे मासिक प्रस्तुत बीटासाठी प्रेरणादायी ठरेल.

आज जगावर ओढावलेल्या कोरोनाच्या महामारीच्या संकटाच्या काळात शिक्षण विदयार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी नवनविन संकल्पना वापरुन काम करणे गरजेचे आहे. तेंव्हा हे मासिक सदर काळात उपयुक्त ठरेल. सर्व विदयार्थी व शिक्षकांची वाचनाची आवड लक्षात घेऊन सोप्या पदधतीने ज्ञान व मनोरंजन देण्याची कल्पना आवडली. छोटया छोटया उपयुक्त सदरातून विदयार्थ्यांना ज्ञान माहितीचा खजिना उपलब्ध होताना दिसत आहे. सदर मासिक सर्व जिल्हा भरात मोफत डिजिटल स्वरुपात प्रसारित होत असल्याने सर्व गावातील विदयार्थी व शिक्षकांनी याचे वाचन करावे व वाचन संस्कृतीचे जतन करावे.

सदरील ज्ञानसंस्कार मासिकाच्या सर्व टीम ला भावी वाटचालीसाठी परत एकदा हार्दिक शुभेच्छा ....!

**श्री. जोंधळे पी. जे.**
**केंद्रप्रमुख**
**केंद्र - हळदा ता. भोकर**

## शुभ संदेश



**श्री. ग. ई. कांबळे**
**केंद्रप्रमुख**
**केंद्र - निमगांव ता. हदगांव**

## अभिनंदनीय शुभेच्छा संदेश...!

शिक्षण क्षेत्रात दरवर्षी नवनविन प्रयोगाच्या माध्यमातुन जिल्हयात नाव उंचावणाऱ्या हदगाव तालुका.. यशस्वी उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षकांची व त्यांच्या प्रयत्नांची जणू खाण होय. याच हदगाव तालुक्यातील बरडशेवाळा बीटचे ज्ञानसंस्कार डिजिटल ई मासिक नुकतेच सोशल मिडीयाच्या माध्यमातून वाचण्यात आले. मासिक पाहून मासिकाचे वाचन करताच त्या मासिकाची कल्पकता व उपयुक्तता लक्षात आली. सदर मासिकाच्या निर्मितीचे संकल्पक श्री. सुपलकर सर व त्यांच्या संपूर्ण टिमचे अभिनंदन..।

वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. या धावपळीच्या युगात विदयार्थी केवळ अभ्यासाचा पाठयक्रम वाचन करताना दिसत आहेत. इतर अवांतर वाचन म्हणजे त्यांना कंटाळवाणे काम वाटते. हीच बाब ओळखून वाचन संस्कृती जोपासण्याच्या महायज्ञास या बरडशेवाळा बीटच्या माध्यमातून सुरुवात झाल्याचे दिसून येते. सदर ई मासिक शिक्षकांना देखील दिशादर्शक ठरणार आहे. त्यांनी त्यांच्या शाळांत राबविलेले उपक्रम, कृती, प्रयोग, शैक्षणिक कार्य यांची इतर सर्व शिक्षकांना ओळख होणार आहे. या पथदर्शी उपक्रमातून सर्वांचा फायदा होणार आहे.

आधुनिक युग हे सतत झपाटयाने बदलत चालले आहे. सर्व क्षेत्रात नवनवे शोध लागून नित्य नव्या ज्ञानात भर पडत आहे व नाविन्याचा कास धरावा लागत आहे हे शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. शिक्षण क्षेत्रातही नवनविन विचारप्रवाह अंगीकारले जात आहेत. या नविन विचारप्रवाहात हे डिजिटल ई बुक ज्ञान माहितीसह संस्कार करण्यास समर्थ ठरावे यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा...!

**श्री. ग. ई. कांबळे**
**केंद्रप्रमुख**
**केंद्र - निमगांव ता. हदगांव**

# शुभ संदेश

**श्रीमती. वैशाली आडगांवकर**
**शिक्षण विस्तार अधिकारी**
**विभाग - बरडशेवाळा**
**ता. हदगांव जि. नांदेड**

ज्ञानसंस्कार मासिकाच्या सर्व वाचक वर्गाला नमस्कार ..!

मागील महिन्यात एका छोटयाशा स्वरुपातील ZOOM मिटींग मध्ये आपल्या ज्ञानसंस्कार मासिकाच्या प्रथम अंकाचे मा. शिक्षणाधिकारी महोदय यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्यानंतर मासिकाचा पहिला अंक Whatsapp Flippbook सोशल माध्यमातून सर्व जिल्हा भरात Share झाला. सर्वांच्या या मासिकाबददल शुभेच्छा व प्रतिक्रिया भरभरुन स्वरुपात प्राप्त झाल्या. या सर्व शुभेच्छा आमच्या बरडशेवाळा बीट मधील सर्व शिक्षक व विदयार्थी यांना नक्कीच उर्जा देणाऱ्या ठरणार आहेत. आपल्या शुभेच्छा व प्रतिक्रियांबददल मनपूर्वक धन्यवाद.

सध्या शाळा बदं पण शिक्षण सुरु ही प्रकिया सुरु आहे. या कोरोनाच्या कठीण काळात काही दिवस आपल्याला असेच ऑनलाईन स्वरुपात विदयार्थी व पालक यांच्या सोबत संवाद साधायचा आहे. व विदयार्थी यांचे शिक्षण पूर्ण करायचे आहे. शिक्षण प्रकियेला कुठेही विराम मिळता कामा नये. शिक्षण हे गतिशिल रहायला हवे. या हेतून विविध उपक्रम व पर्याय अवलंबले जात आहेत. याच पर्यायाची एक बाजू म्हणून या अंकाची निर्मिती केलेली आहे. आता दुसरा अंक आपल्या हाती येत आहे. निश्चितच हा अंक पण आपल्या सर्वांना वाचन करायला आवडेल. आपल्या शुभेच्छा व प्रेरणा आमच्या बीट मधील सर्वांना काम करायला अधिकच उर्जा देत राहतील धन्यवाद..

**श्रीमती. वैशाली आडगांवकर**
**शिक्षण विस्तार अधिकारी**
**विभाग - बरडशेवाळा**

शुभ संदेश



**श्री. सोनटक्के रंगराव गंगाधरराव**
**केंद्रप्रमुख**
**केंद्र - भानेगांव व पाथरड**
**ता. हदगांव जि. नांदेड**

## अभिनंदनीय शुभेच्छा संदेश...!

बरडशेवाळा बीट अंतर्गत चालणाऱ्या जाणाऱ्या या अभिनव उपक्रमाच्या माहे ऑगस्ट २०२० दुसऱ्या ज्ञानसंस्कार ई मासिकास सर्वप्रथम मनःपूर्वक अभिनंदनीय भरभरून शुभेच्छा.....

आ.शि.वी.अ. श्रीमती आडगावकर मॅडम व ज्यांच्या संकल्पनेतून, मेहनतीतून साकार होत असलेले हे ज्ञानसंस्कार ई बुक असे उपक्रमशिल शिक्षक श्री सुपलकर सर त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.

श्री सुपलकर सर आपले खूप खूप अभिनंदन व कौतुक. आपल्या या अभिनव संकल्पनेमुळे बीट मधील सर्व विदयार्थी व शिक्षकांना लेखन करण्याची, अवांतर वाचन करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

भानेगाव केंद्र अंतर्गत माहे जुलै महिन्यातील पहिल्या मासिकात आपल्या साहित्याचा भरभरून खजिना पाठविलेले श्रीमती सेनकुडे मॅडम, श्री दहेकर सर श्रीमती धांडे मॅडम व सहभागी सर्व उपक्रमशील शिक्षक शिक्षिका व सहभागी विद्यार्थी आपले सर्वांचे अभिनंदन व कौतुक.

साहित्य लेखनाच्या या कार्यास तसेच या महिन्याच्या ज्ञानसंस्कार या ई मासिकास माझ्या केंद्राच्या वतीने शुभेच्छा! व पुढील वाटचालीस मनःपूर्वक खूप खूप अभिनंदनीय शुभेच्छा!

"पुस्तकांच्या जगात
मी नाही कधी एकटा,
शब्द बोलतात माझ्याशी
मी आहे त्यांचा सखा.."

**श्री. सोनटक्के रंगराव गंगाधरराव**
**केंद्रप्रमुख**
**केंद्र - भानेगांव व पाथरड**

# मनोगत



**श्री.सुपलकर एस.बी.**

**सहशिक्षक**

**प्रा.शा. शिबदरा म**

**ता. हदगांव जि. नांदेड**

## आनंददायी मनोगत

सर्व शिक्षक बंधू भगिनी तसेच विदयार्थी मित्र यांना सादर नमस्कार...

मागील महिन्यात दि. ११/०७/२०२० शनिवार रोजी सकाळी ठिक १०:०० वाजता Zoom मिटींग वेबिनारच्या माध्यमातून डायटच्या प्राचार्या आदरणीय श्रीमती.जयश्री आठवले मॅडम, शिक्षणाधिकारी (प्रा.) आदरणीय श्री. प्रशांत दिग्रसकर साहेब, उपशिक्षणाधिकारी आदरणीय श्री. मठपती साहेब, आपल्या तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी आदरणीय श्री. ससाणे साहेब, मनाठा बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी आदरणीय श्री. पाटील साहेब, आपल्या बीटच्या शिक्षण विस्तार अधिकारी आदरणीय श्रीमती. वैशालीताई आडगांवकर मॅडम, चिंचगव्हाण केंद्राचे केंद्रप्रमुख आदरणीय श्री. सुधीर गोडघासे साहेब, डायट नांदेड चे आय.टी. विभागाचे विषय सहाय्यक श्री. संतोष केंद्रे सर, या मासिकाचे निर्मिती करणारे श्री. सुपलकर सर तसेच या तालुक्यातील सर्व सन्माननीय शिक्षण विस्तार अधिकारी, सर्व केंद्रांचे केंद्रप्रमुख, सर्व केंद्रांचे केंद्रिय मुख्याध्यापक, अंतर्गत शाळांचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक - शिक्षिका यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्रा) श्री. प्रशांत दिग्रसकर साहेब यांच्या हस्ते या ज्ञानसंस्कार डिजिटल मासिकाच्या पहिल्या अंकाचे (जुलै २०२०) अंकाचे ऑनलाईन डिजीटल पदधतीने उदघाटन (प्रकाशन) झाले.

सदर मासिक सध्या प्रचलित असलेल्या सोशल मिडीयाच्या माध्यमातून अवघ्या काही तासात संपूर्ण जिल्हा भरात विविध ग्रुप वर, तसेच फिलपबुकच्या माध्यमातुन विविध प्लॅटफॉर्मवर सहज उपलब्ध झाले. सर्वांनी अतिशय आत्मीयतने मासिक पाहिले, मासिकातील लेख, कविता, विदयार्थी उपयोगी बाबी, सर्वांनी आवर्जून पाहिल्या. विविध तालुक्यातून फोन कॉल, व संदेशाच्या माध्यमातून या अंकाबददल प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. सर्वांनी आवर्जून आम्हाला आपल्या प्रतिक्रिया पाठवल्या व पुढील अंकासाठी शुभेच्छा दिल्या.

विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हेच ध्येय व उददेश समोर ठेवून केवळ शिक्षकांनी शिक्षक व विदयार्थ्यांसाठी हा उपयोगी अंक प्रत्यक्षात आणायचे ठरविण्यात आले होते. आणि आपल्या सर्वांच्या शुभेच्छारुपी आशीर्वादाने हा अंक व या अंकाचा आमचा उददेश सफल झाला असे मला वाटते.

जिल्हा परिषद शाळांतील विदयार्थ्यांमध्ये सुप्त कलागुण व गुणवत्ता खूप आहे. ही गुणवत्ता हेरुन त्याला न्याय देण्याचे कार्य या मासिकाच्या माध्यमातून चालविले जाणार आहे. खऱ्या गुणवत्तेची ओळख तेंव्हाच होते जेंव्हा ती गुणवत्ता सर्व जगासमोर येते. गुणवत्ता विकसित होण्यासाठी त्या विदयार्थ्यांमागे सततची प्रेरणा, पाठबळ आणि त्यांना संधी निर्माण करुन देणे महत्वाचे आहे. संधी उपलब्ध होताच विदयार्थ्यांच्या पंखाना बळ येईल व ते विदयार्थी उत्तुंग भरारी घेण्यास तयार होतील. असा आमचा विश्वास आहे.

मराठी भाषा खूप समृदध भाषा आहे. या भाषेतील विविध साहित्य प्रकारांचा आस्वाद घेण्यासाठी वाचनाची व लेखणाची आवड बालवयापासूनच निर्माण केली तर ती आवड पुढे टिकून राहून या बालसाहित्यिकांमधून मोठे साहित्यिक तयार होण्यास वेळ लागणार नाही. या बाल कलाकारांना साहित्यक्षेत्रात समृदध होण्यासाठी अवांतर वाचणाची व लेखन करण्याची आवड निर्माण व्हावी याच हेतूने प्रेरित होऊन हे एक व्यासपीठ तयार केलेले आहे.

आपल्या सर्वांच्या शुभेच्छारुपी आशीर्वादाने आम्हाला निश्चितच बळ मिळेल व या आम्ही सर्वांनी मिळून लावलेल्या ज्ञानसंस्कार मासिकाच्या छोटयाशा रोपटयाचे वटवृक्ष होण्यास वेळ लागणार नाही.

आपल्या शुभेच्छा अशाच सदैव पाठीशी राहू दयाव्यात धन्यवाद..

**श्री.सुपलकर एस.बी.**
**सहशिक्षक**
**प्रा.शा. शिबदरा म**
**ता. हदगांव जि. नांदेड**



संकलक :

**श्री. सुपलकर श्यामसुंदर बालाप्रसाद**
(सहशिक्षक)
जि.प.प्रा.शाळा शिबदरा म
ता. हदगांव जि. नांदेड
मो. 8380977961
8830059612

**या लेखातील काही छायाचित्रे फोटो हे इंटरनेटवरुन साभार घेतलेली आहेत. या अंकात प्रसिदध झालेल्या लेखामधील विचारांशी किंवा मतांशी मासिक सहमत असेलच असे नाही. संबंधितांचे विचार मत या स्वरुपात फक्त प्रकाशित करण्यात आलेले आहेत.**
धन्यवाद

अक्षरजुळणी आरेखन :

**श्री. सुपलकर श्यामसुंदर बालाप्रसाद**
(सहशिक्षक)

## संपादकीय :

ज्ञानसंस्कार डिजिटल इ मासिकाचा दुसरा अंक आपल्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

नुकतेच मागील महिन्यात या मासिकाचे ऑनलाईन प्रकाशन झाले आणि विविध तालुक्यातून नव्हेतर इतर जिल्हयातून ही आम्हाला या मासिकाच्या निर्मिती बददल शुभेच्छा प्राप्त झाल्या.

जे जे आपणांस ठावे ते इतरांना सांगावे या वाक्या प्रमाणे चांगल्या गोष्टी खरच इतरांना सांगणे ही भावना खूप मोलाची आहे. आज जिल्हा परिषद शाळांमधून जे शिक्षण दिले जाते त्या ज्ञानाची जोड यशाची शिखरे सर करायला विदयार्थ्यांना निश्चितच मदत होणार आहे. शिक्षण हे केवळ शिक्षक केंद्रित न होता, विदयार्थी व शिक्षक यांच्यात सतत आंतरक्रिया घडत राहून अध्यापनाचा प्रयत्न चालविला जातो.

या ज्ञानसंस्कार दुस-या मासिकाच्या अंकात ही आपणास विविध अर्थपूर्ण विषयावंर शिक्षक व विदयार्थी यांनी लिहिलेल्या लेखमाला, तसेच नियमित प्रकाशित होणारी सदरे यातून माहितीचा खजिना आपल्या सर्वांना प्राप्त होणार आहे. तरी आपण सर्वांनी या ज्ञानयज्ञात सहभागी होवून मासिकाचे वाचन करावे व विदयार्थ्यांच्या कलेस दाद दयावी ही विनंती.

सर्वांनी आपल्या ज्ञान संस्कार मासिकास सहकार्य करत रहावे.. धन्यवाद...

**श्री. सुपलकर श्यामसुंदर बालाप्रसाद**
(सहशिक्षक)
जि.प.प्रा.शाळा शिबदरा म
ता. हदगांव जि. नांदेड

# अनुक्रमणिका ज्ञानसंस्कार अंतरंग

तिमिरातुनी तेजाकडे...

वर्ष : पहिले | ऑगस्ट २०२० | अंक २ ला


| अक्र | लेखमाला / आशय घटक | लेखक / कवी | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | विभाग अ शिक्षक / शिक्षिका यांचे लेख संग्रह | -- | १६ |
| १ | अण्णाभाऊ साठे जयंती विशेष | श्री. मनोहर बसवंते | १७ |
| २ | एकाग्र करी मन। तेणे होईल समाधान रे । | श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे | १९ |
| ३ | देश माझा ( कविता ) | श्रीमती. वैशाली धांडे | २१ |
| ४ | विविध शालेय स्तरावरील स्पर्धा परिक्षांची माहिती | श्रीमती. अर्चना इटकरे - हराळे | २२ |
| ५ | कोरोनाच्या सोबतही ( कविता ) | श्री. गुलाब रावसाहेब जावळे | २५ |
| ६ | आपली शाळा ( कविता ) | श्री. मनोहर बसवंते | २६ |
| ७ | आणि बदल्या रदद झाल्या.. | श्री. चंद्रकांत हंगरगे | २७ |
| ८ | पढना लिखना सिखो ( हिंदी कविता ) | श्री. सुपलकर श्यामसुंदर | २९ |
| ९ | वाचन संस्कृतीत होत चाललेले बदल | श्री. पोटे बी.डी. | ३० |
| १० | शाळाई (कविता ) | श्री. औरादकर एस. ए. | ३२ |
| ११ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण | ---- | ३३ |
| १२ | माझी शाळा माझी परसबाग | श्री. आंडगे सी. एस. | ३५ |
| १३ | माझी शाळा माझा उपक्रम फाईव्ह स्टार | श्री. सर्पे बी. एम. | ३८ |
| १४ | भारतीय स्वातंत्र्य | श्रीमती. वैशाली धांडे | ४० |
| १५ | येता पावसाच्या सरी (कविता ) | श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे | ४२ |
| १६ | दप्तराविना शाळा | श्रीमती. अर्चना इटकरे - हराळे | ४३ |
| १७ | मोबाईल आणू तरी कोठून ( कविता ) | श्री. योगेश भंडारे | ४५ |
| १८ | क्रांतीचा सूर्य (कविता ) | सौ. कुंटूरकर आर. एन. | ४६ |
| १९ | पिंक रिबन | श्री. सुपलकर श्यामसुंदर | ४७ |
| | विभाग ब मान्यवरांचे लेख आपल्या भेटीला.. | -- | ४९ |
| २० | विदयार्थी हित साधणारा पाठयपुस्तकातील बदल | श्री. सुनिल धोबे | ५० |
| २१ | विचार बदला, देश बदलेल | श्री. नागोराव सा. येवतीकर | ५३ |
| | विभाग क विदयार्थी / विदयार्थीनी यांचे लेख संग्रह | -- | ५७ |

अनुक्रमणिका

# ज्ञानसंस्कार

तिमिरातुनी तेजाकडे...

अंतरंग

वर्ष : पहिले ऑगस्ट २०२० अंक २ ला


| अक्र | लेखमाला / आशय घटक | लेखक / कवी | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| २२ | बालमित्रांचे लेख | विदयार्थी | ५८ |
| | विभाग ड इतर नियमित प्रसिदध होणारे सदर | -- | ६० |
| २३ | बालचित्रकला | विदयार्थी | ६१ |
| २४ | दिनविशेष | -- | ६२ |
| २५ | निवडक बोधकथा / संस्कारकथा | -- | ६३ |
| २६ | ओळख थोर विभूतींची... | -- | ६४ |
| २७ | म्हणी ओळखा... | -- | ६५ |
| २८ | Yes ....... मी सोडवणार S शब्दकोडं. | -- | ६६ |
| २९ | चित्रशब्दकोडे | -- | ६७ |
| ३० | चित्र रंगवा.. | -- | ६९ |
| ३१ | मार्ग शोधा... | -- | ७० |
| ३२ | दोन चित्रातील फरक ओळखा | -- | ७१ |
| ३३ | Math Puzzle For Brain | -- | ७२ |
| ३४ | Picture Puzzle for Brain | -- | ७३ |
| ३५ | ठिपके जोडा | -- | ७४ |
| ३६ | सुवचन / सुविचार | -- | ७५ |
| ३७ | पत्रास कारण की..... | -- | ७६ |
| ३८ | मासिक लेखना बददल आवाहन | -- | ७७ |

# शोक संदेश.......



**जयराम ब्रम्हाजी डवरे**

**सशि जिपप्राशा सावरगांव माळ ता.हदगांव जि. नांदेड**

जो आवडे सर्वांना

तोची आवडे देवाला.....**जयराम ब्रम्हाजी डवरे**

मनाठा गावी जन्म व तेथेच माध्यमिक पर्यंतचे शिक्षण. मध्यम उंची रसाळ, मृदूवाणी, संयमी व गंभीर स्वभाव सर्वांशी मनमोकळे नाते ठेवणारे जयराम डवरे सर....

निमगांव ता. हदगांव, भोगाव ता. अर्धापूर, व सावरगाव माळ ता. हदगांव या शाळांवर आपल्या कार्याने नवोपक्रमाने ठसा उमटवणारे सर..

प्रा.शा. सावरगाव माळ येथे तर त्यांनी उपक्रमांची शृंखलाच तयार केली होती. अभिलेखे उत्तम ठेवणे, सर्व कामे उत्तमरित्या विभागुण देणे सोबतच गुणवत्तावाढी साठी सहकाऱ्यांना नेहमी प्रेरित करणे केवळ शब्दांतूनच नव्हेतर आपल्या कृतीतून....

कृतीशील व्यक्तिमत्व चांगले, प्रशासन चालवू शकतो हे त्यांनी सिदध केले.

देशव्यापी प्रशिक्षण "निष्ठा" ज्यात त्यांनी विज्ञान व क्षमता बांधणी विषय तळमळीने प्रशिक्षणार्थ्यांसमोर मांडला. अध्यापन कसे कृतिशील व आनंददायी असावे हे अनेक प्रयोगातून सर्वांसमोर मांडले.

हळव्या व संवेदनशील मनाचे जयराम डवरे सर अचानक असे आपला निरोप घेतील असे वाटले नव्हते. अठठेचाळीस वर्ष वय हे काही सोडून जाण्याचे नव्हते.

त्यांच्या कुटूंबीयांवर इश्वर कृपादृष्टी ठेवो. त्यांना **भावपूर्ण श्रदधांजली**.....

# विभाग अ


## शिक्षक / शिक्षिका यांचे लेख व कविता संग्रह

# अण्णाभाऊ साठे जयंती विशेष

श्री. मनोहर बसवंते
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र पळसा ता. हदगांव जि.नांदेड
मो. 8830322659

## अण्णाभाऊ साठे जयंती विशेष

पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती कष्टकरी, श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे, असे विज्ञानवादी विचार असणारे थोर साहित्यिक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे यंदाचे वर्ष जन्मशताब्दी वर्ष आहे, मराठी साहित्यविश्वातील एक अनमोल रत्न, उपेक्षित, पिचलेल्या आणि तळागाळातील लोकांचे दुःख जगाच्या वेशीवर टांगण्याचे काम अण्णाभाऊ साठे यांनी केले आहे.




अण्णाभाऊ साठे यांचा जन्म 1 ऑगस्ट 1920 रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या गावी एका मजूर कुटुंबात झाला, घरी हातातोंडची गाठभेट होत नसताना त्यांनी शाळेत जाणे शक्य नव्हते त्यामुळे अण्णाभाऊ कधी औपचारिक शिक्षण घेऊ शकले नाहीत परंतु गरिबीने आणि परिस्थितीने त्यांना भरपूर शिकवण दिली.

अण्णाभाऊ एका ठिकाणी असे लिहतात की, मी जे जगलो आहे ते लिहले आहे माझ्या कादंबरी, कथा, कवितेमध्ये मला कल्पना विलास करावा लागला नाही तर यांच्यातील पात्रांसोबत मी जगलेला आहे, महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त कादंबरी **फकिरा** यातील नायक ज्याने इंग्रजांचा खजिना लुटला होता तो फकिरा अण्णाभाऊंच्या पाचवीच्या दिवशी येऊन बाळाला घुटी म्हणून लुटलेल्या खजिन्यातील सुरती रुपये देऊन गेला होता.

अण्णाभाऊंनी साहित्याच्या माध्यमातून जगासमोर अनेक अपरिचित नायक उभे केले. फकिरा, सतू, व्यंकूसारखे महानायक जे अत्यंत तळागाळातील होते, तसेच अण्णाभाऊंच्या लिखाणातील स्त्री ही तर स्वतंत्रपने अभ्यास करून लिहावे असा गहन विषय आहे त्यांनी सहनशील किंवा रूढी परंपरेखाली दबून गेलेल्या स्त्रियांपेक्षा

स्वतंत्र अस्तिव तयार करणाऱ्या, अन्यायाला वाचा फोडणाऱ्या वैजयंता, आवडी, दुर्गा सारख्या स्त्रिया उभ्या केल्या.

अण्णाभाऊ गिरणी कामगार असल्यामुळे त्यांच्यावर डाव्या विचारांचा प्रभाव होता. रशिया मध्ये तर अण्णाभाऊंच्या साहित्याचे पारायणे केली जात. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान श्री पंडित जवाहरलाल नेहरू रशियाच्या दौऱ्यावर गेले असता त्यांना तेथील अण्णाभाऊंच्या वाचकांनी अण्णाभाऊ बद्दल विचारणा केली परंतु अण्णाभाऊंचा परिचय नसल्यामुळे पंडितजींना उत्तर देता आले नाही तेथून परतल्यावर पंडितजींनी लता मंगेशकर सोबत अण्णाभाऊची भेट घेतली.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात अण्णाभाऊंनी भरीव असे कार्य केले आहे. तत्कालीन मोठे नेते स.का. पाटील, मोरारजी देसाई यांचा संयुक्त महाराष्ट्राला असणारा विरोध अण्णाभाऊंनी शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकर यांच्या सोबतीने शाहिरीतून प्रबोधन करून लोकचळवळ तयार करून त्यांचा विरोध मोडून काढला.

अण्णाभाऊंच्या अनेक कादंबऱ्यावर चित्रपट निघाले, आवडी या कादंबरीवर टिळा लावते कुंकवाचा तसेच सध्याची मराठीतील आघाडीची नायिका, गुणी अभिनेत्री शिल्पा ठाकरे अभिनित आवडी हा चित्रपट सुद्धा तयार झाला आहे (लॉकडाउन मुळे प्रदर्शन थांबले आहे) तसेच फकिरा या कादंबरीवर **फकिरा** नावाचा अजरामर चित्रपट आला त्यामाणेच **अशी ही साताऱ्याची तऱ्हा** नावाचा चित्रपट सुद्धा अण्णाभाऊंच्या कादंबरी वर आहे.

फकिरा ला महाराष्ट्र शासनाने सर्वोत्कृष्ट पुरस्काराने गौरविले आहे तसेच छत्रपती संभाजी महाराज यांची अजरामर भूमिका साकारणारे अभिनेते खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी फकिरा चित्रपट काढून त्यात भूमिका करण्याचा मनोदय त्यांच्या मुलाखतीत व्यक्त केला आहे.

अण्णाभाऊंनी 35 कादंबऱ्या,13 कथासंग्रह, 3 नाटकं, स्टालिनग्राड चा प्रसिद्ध पोवाडा, माझा रशियाचा प्रवास हे प्रवासवर्णन असं भरपूर साहित्य लिहले असून त्यांच्या साहित्यावर एकुण 7 चित्रपट आले आहेत.

आज अण्णाभाऊ साठे यांचे 100 वी जयंती साजरी करताना अण्णाभाऊ आणखी उपेक्षित राहिले असेच म्हणावे लागेल कारण हा प्रतिभावंत आणखी ज्ञानपीठ पुरस्कार मिळण्यापासून वंचित आहेत, अनेक राजकीय-सामाजिक संघटनानी मागणी करून सुद्धा आणखी महाराष्ट्र भूषण, भारतरत्न पुरस्कारापासून वंचित आहेत.

एक उपेक्षित महान साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांना त्यांच्या 100 व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन....

**श्री. मनोहर बसवंते**
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र पळसा ता. हदगांव जि.नांदेड
मो. 8830322659
Baswantemanohar2685@gmail.com

श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा गोजेगांव
ता. हदगांव जि.नांदेड

# एकाग्र करी मन। तेणे होईल समाधान रे।

एकाग्र करी मन । तेणे होईल समाधान रे। हे ज्ञानेश्वर माऊलींचे सुवचन ऐकले की एकाग्रतेने किती समाधान लाभते जे जाणवते. आपल जीवन यशस्वी करायचं असेल तर आपण मनापासून एकाग्रतेने काम केले पाहिजे, तरच आपलं जीवन यशस्वी होतं.



सर्व जगाला विसरुन मनाची शक्ती दृढपणे स्थिर करणे यालाच एकाग्रता म्हणतात. एकाग्रता म्हणजे एकचित्तता. ही एकचित्तता आपल्याला आपल्या कामात यश मिळवून देते. आपल्या कामात द्विधामनस्थिती असेल तर, त्या कार्याचा नाश होतो. मननामुळे माणसाला एकाग्रता लाभते. तसेच आपल्या मनाचा एक दोष आहे तो म्हणजे चंचलता. माणसाचे मन हे चंचल असते. हे चंचल मन वाऱ्यासारखे धावत असते. या चंचलतेमुळेच मनात संकल्प, विकल्प निर्माण होतात. हे स्वैर धावत सुटलेले मन सावराचे असेल तर आपल्या मनाची सर्व शक्ती दृढपणे स्थिर करुन एकाग्रता निर्माण करावी लागेल. तरच आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतो. माणसाने आपल्या कामात इतके तन्मय व्हावे की, समोर कोणी जरी आले तरी आपल्याला ते माहित होऊ नये. एकदा नेपोलियनला बिनसाखरेचा चहा दिला. नेपोलियनने तो चहा चटकन पिऊन टाकला. तो आपल्या कामात इतका तन्मय होता की, चहात साखर नाही हे त्यांना कळलेच नाही.

अशी एकाग्रतेची, तन्मयतेची, एकरुपता, एकचित्तता, तल्लीनता ची किती तरी उदाहरणे

आहेत. एकाग्रता साध्य करण्यासाठी मनुष्याच्या डोळयापुढे एक विधायक ध्येय साधना पाहिजे. आपण ध्येयधुंद होऊन कार्य केले तर जीवनाची यशश्री लाभते, म्हणूनच माणसाचे मन हे बुदधीच्या अनुरोधाने चालणारे असावे. बुदधीने सांगावे, मनाने करावे. मन आणि बुदधी यांचे ऐक्य असावे तरच योग्य निर्णय घेता येतो. एकदा द्रोणाचार्यांना आपल्या शिष्याची परीक्षा घ्यायची होती. झाडावर एक पक्षी



टांगला होता आणि त्याच्या डोळयाचा वेध करायचा होता. आचार्यांनी प्रत्येक शिष्याला जवळ बोलावून विचारले, "तुला काय दिसते?" सगळे म्हणाले झाड दिसते, पाने दिसतात, पक्षी दिसतो. परंतू एकटा अर्जून म्हणाला, "मला फक्त डोळा दिसतो" अर्जूनाच्या या एकाग्रतेमुळेच तो वीर धनुर्धर बनला. एक अद्वितीय धनुर्धर म्हणून अर्जूनाची ओळख आहे.

"ध्यान, एकाग्रता ही सदैव सज्ज असणारी, उपयोगी व संकटात मुक्त करणारी फायदेशीर सवय आहे. एकाग्रता आपल्या जीवनातला एक परम आवश्यक गुण आहे." असे चार्ल्सस डिकन्स या विचारवंताचे मत आहे. म्हणूनच माणसाने आपला प्रत्येक क्षण आणि सर्व शक्ती कर्मातच उपयोगीली पाहिजे. अशी ध्यान आणि एकाग्रताची सवय ठेवावी. एकाग्रतेसाठी संयमाची अत्यंत आवश्यकता आहे. जीवनाचे स्वरुप उलगडायचे असेल तर, व्यक्तीने आपले वळण संयमाकडे आहे की स्वच्छंदाकडे हे जाणून घेतले पाहिजे. विनोबा भावे यांनी म्हटले आहे की, "संयम ही जीवनाची किल्ली आहे." संयमाची ही जीवनाची किल्ली आपणांजवळ असेल तर आपल्याला एकाग्रतेची सवय लागेल आणि आपले मन एकाग्र झाल्यावर आपल्याला अशक्य असे एकही काम नाही. जर एकाग्रतेचा अभाव असेल तर आपले एकही काम यशस्वी होणार नाही. या एकाग्रतेच्या अभावामुळे आपली शक्ती विकेंद्रीत होऊन तिचा अपव्यय होतो म्हणून जीवनात एकाग्रता, तन्मयता, एकरुपता, एकचीत्तता, परिमितता असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. माणसाने एकाग्रतेने काम करावे तरच समाधान मिळते. म्हणूनच ज्ञानेश्वर माऊलींनी आपल्या सुवचनात म्हंटले आहे...

"एकाग्र करी मन। तेणे होईल समाधान रे ।"



**श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे**
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा गोजेगांव
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9403046894

# कविता - देश माझा

श्रीमती. वैशाली प्रल्हाद धांडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा रुई (धा.) केंद्र -
भानेगांव ता. हदगांव
मो. 9689213411

भारत देश माझा
आहे सोन्याची खाणं.

गुण्यागोविंदानं नांदती सारे,
नाही कशाची वानं.

अनेक जाती, धर्म, पंथ
नसे कोणी मोठा आणि लहान.

समान संधी, समान दर्जा,
आहे ही संविधानाची देनं.

सुजलाम - सुफलाम येथील भूमी,
पिकवती मोती येथील रानं.

भारत भू साठी बलिदान देण्या,
सदा वाटे सैनिकांस शानं.





श्रीमती. वैशाली प्रल्हाद धांडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा रुई (धा.)
केंद्र -भानेगांव ता. हदगांव
मो. 9689213411

# विविध शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षांची माहिती

श्रीमती.अर्चना इटकरे - हराळे
सहशिक्षिका
जि.प.प्रा. शाळा रुई (धा.)
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9420539611

सध्याचे युग हे स्पर्धापरीक्षांचे आहे. "आपल्या गुणवत्तेची गरजेनुसार नोकरी मिळविण्याच्या उद्देशाने घेतली जाणारी परीक्षा म्हणजेच स्पर्धा परीक्षा होय" स्पर्धा परीक्षा अशी परीक्षा असते की स्पर्धेत त्यांच्या परीक्षेच्या गुणांवर आधारित त्यांचा दर्जा ठरतो व त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन




तपासल्या जातो तेव्हाच ते समाजसेवेसाठी योग्य समजले जातात, परंतु ही तयारी शालेय शिक्षणापासून केल्यास यश हे लवकर मिळण्यास मदत होते म्हणून शासकीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा यांची माहिती विद्यार्थी पालक व शिक्षकांना असावी यासाठी संकलित केली आहे.

1) पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (www.mscepune.in)

पात्रता : महाराष्ट्र राज्यातील शासनमान्य शाळेतील इयत्ता पाचवी मधील विहित गटातील विद्यार्थी.
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी: ऑगस्ट.
परीक्षेचा कालावधी : फेब्रुवारी किंवा मार्च.

2) माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (www.mscepune.in)

पात्रता :- महाराष्ट्र राज्यातील शासनमान्य शाळेतील इयत्ता आठवी मधील विद्यार्थी
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी :- ऑगस्ट
परीक्षेचा कालावधी:- फेब्रुवारी किंवा मार्च

3) शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा (www.mscepune.in)

पात्रता:- महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील इयत्ता चौथी मधील फक्त मुले

आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- ऑगस्ट
परीक्षेचा कालावधी:- फेब्रुवारी किंवा मार्च




4) आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा (www.mscepune.in)

पात्रता:- आदिवासी क्षेत्रातील रहिवाशी असणारे अनुसूचित जमातीचे इयत्ता चौथी मधील फक्त मुले

आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- ऑगस्ट
परीक्षेचा कालावधी:- फेब्रुवारी किंवा मार्च

5) विमुक्त जाती व अनुसूचित जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा (www.mscepune.in)

पात्रता:- आश्रम शाळेतील इयत्ता चौथी मधील विद्यार्थी

आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- ऑगस्ट
परीक्षेचा कालावधी:- फेब्रुवारी किंवा मार्च

6) जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा (www.navodaya.nic.in)

पात्रता:- इयत्ता पाचवीतील विद्यार्थी
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- सप्टेंबर
परीक्षेचा कालावधी:- फेब्रुवारी

7) सैनिकी शाळा प्रवेश परीक्षा( सातारा) (www.sainik.satara.org)

पात्रता:- इयत्ता पाचवीतील फक्त मुले
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- ऑक्टोबर
परीक्षेचा कालावधी:- फेब्रुवारी किंवा मार्च

8) राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज,डेहराडून (www.irmc.org)

पात्रता:- इयत्ता सातवी/ इयत्ता आठवी फक्त मुले
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- जून
परीक्षेचा कालावधी:- जून/ डिसेंबर

9) राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षा (www.mscepune.in)

पात्रता:- इयत्ता आठवीत शिकत असलेला विद्यार्थी
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- सप्टेंबर
परीक्षेचा कालावधी:- नोव्हेंबर 3 रा रविवार

10) श्री शिवाजी मिलिटरी स्कूल, पुणे व नाशिक (www.irmc.org)

पात्रता:- इयत्ता चौथीत शिकत असलेला विद्यार्थी
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- सप्टेंबर
परीक्षेचा कालावधी:- एप्रिल

11) राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा (राज्यस्तर) (www.mscepune.in)

पात्रता:- प्राथमिक, माध्यमिक विहित वयोगटानुसार विद्यार्थी
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- सप्टेंबर
परीक्षेचा कालावधी:- नोव्हेंबर

12) राष्ट्रभाषा हिंदी परीक्षा

पात्रता:- इयत्ता पाचवी ते आठवी चे विद्यार्थी
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी :-जुलै
परीक्षेचा कालावधी:- सप्टेंबर

13) डॉ होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा

पात्रता:- सहावी व नववीचे विद्यार्थी
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- डिसेंबर
परीक्षेचा कालावधी:- फेब्रुवारी

14) एलिमेंटरी / इंटरमिजिएट चित्रकला परीक्षा

पात्रता:- इयत्ता सातवी ते नववी चे विद्यार्थी
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- जुलै
परीक्षेचा कालावधी:- फेब्रुवारी

15) क्रिडा प्रबोधनी, पुणे

पात्रता:- इयत्ता दुसरी ते आठवी चे विद्यार्थी
आवेदन पत्र भरण्याचा कालावधी:- मार्च
परीक्षेचा कालावधी :- -----------------

टीप:- या परीक्षांचा कालावधी व नियोजनामध्ये कमी- अधिक बदल होऊ शकतो, यासाठी कार्यालयाच्या वरिष्ठांशी संपर्क साधावा अथवा संकेतस्थळावरून माहिती घ्यावी.

संकलन



**श्रीमती. अर्चना इटकरे - हराळे**
*सहशिक्षिका*
*जि.प.प्रा. शाळा रुई (धा.)*
*ता. हदगांव जि.नांदेड*
*मो. 9420539611*

# कविता - कोरोनाच्या सोबतही..

श्री. जावळे गुलाब रावसाहेब
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा बामणी तांडा
केंद्र पळसा ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9421294144

संकटाशी मुकाबला
करायला शिकायचं...
कोरोनाच्या सोबतही
जगायला शिकायचं...
दूर्धर रोगाची साथ ही
संकट नि जुलूमाची रात ही
साबणाने हात धुवायला शिकयाचं
कोरोनाच्या सोबतही
जगायला शिकायचं...

सोशल डिस्टंसिंग
आता सर्वांसाठीच
ते पाळताना कुणाला
हीन नाही समजायचं
कोरोनाच्या सोबतही
जगायला शिकायचं...

संकटातही मित्रांना
कधी नाही विसरायचं
येथुन पुढे कुणी कुणाला
शत्रू नाही समजायचं
कोरोनाच्या सोबतही
जगायला शिकायचं...



झालाच संसर्ग त्याचा,
त्यातून बरं व्हायला लागायचं
इतरांना संसर्ग होऊ न देता
त्याला सोबत घेऊन जगायचं
कोरोनाच्या सोबतही
जगायला शिकायचं...



श्री. जावळे गुलाब रावसाहेब
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा बामणी तांडा
केंद्र पळसा ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9421294144

# कविता- आपली शाळा

श्री. मनोहर बसवंते
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र पळसा ता. हदगांव जि.नांदेर्ड
मो. 8830322659

बापाचा धाक
आईचा लळा
आपली शाळा

आनंददायी शिक्षण
काळा फळा
आपली शाळा

शालेय बाग, परसबाग
लावती जिव्हाळा
आपली शाळा

मुक्त वाचनालय
आदर्श प्रयोगशाळा
आपली शाळा

मध्यान्ह भोजन
मित्रांचा मेळा
आपली शाळा

आदर्श प्रार्थना
कुविचारास आळा
आपली शाळा

अभ्यासाची आठवण
पोटात गोळा
आपली शाळा

गावाचा अभिमान
आनंदाचा शहाळा
आपली शाळा

गावाचे लक्ष
पालक दक्ष
व्यवस्थापन समितीला कळवळा
आपली शाळा

प्रशासन काटेकोर
तरी त्यास मायेचा उबाळा
आपली शाळा

डिजिटल तंत्रज्ञान
स्वच्छ परिसर
मुला फुलांचा मळा
आपली शाळा

घडविते उदयाचे आदर्श
नागरिक
बनवाया बलशाली भारत
स्वातंत्र्याचा सोहळा
आपली शाळा

श्री. मनोहर बसवंते
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र पळसा ता. हदगांव
जि.नांदेर्ड
मो. 8830322659

# आणि बदल्या रद्द झाल्या ....!

श्री. चंद्रकांत हंगरगे
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा माळझरा
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9403286700

बदली हा विषय सर्वच शिक्षक वर्गासाठी आणि विद्यार्थी मित्रांसाठी सुद्धा खूप जवळचा आहे. इतर क्षेत्रांमध्येही बदल्या होतात पण आमच्या शिक्षण क्षेत्रातल्या बदल्या म्हणजे थोडासा कडू-गोड, थोडासा आंबट तिखट, थोडासा सुख दुःखाचा आणि विरहाचा संमिश्र प्रसंग! आमच्यापैकी प्रत्येकाला या प्रसंगाला सामोरं जावं लागतंच. यंदा कोरोणाच्या महामारी मध्ये संपूर्ण जग भरडलं जात असताना, शिक्षकांच्या बदल्या होणार असा निर्णय येऊन धडकला आणि बहुसंख्य शिक्षक बंधू भगिनींच्या काळजीत भर पडली, तर काही बंधू-भगिनींना थोडासा सुखद धक्काही बसला. सुखद धक्का यासाठी म्हणतोय की जे दुर्गम क्षेत्रात आहेत, कठीण परिस्थितीत आपली सेवा बजावीत आहेत आणि त्यांना या बदल्यांमधून सोयीस्कर ठिकाणी येता येणार होतं.



पण यंदाच्या बदल्यांमध्ये एक निर्णय अघोरीच होता. मला काय म्हणायचं आहे ते तुमच्या लक्षात आलंही असेल! कोरोणाच्या महामारीनं अख्ख जग काळजीत पडलं. 'सोशल डिस्टंसिंग' हे जगण्याचे एक नवीन तंत्र आलं. बऱ्याच गोष्टी, बरेच व्यवहार जे ऑनलाईन करता येतील घरबसल्या करता येतील, त्या सर्व गोष्टी ऑनलाइन केल्या. एकंदरीत जेवढे जमेल तेवढे सर्व ऑनलाईन करण्याचा प्रयत्न केला गेला. आणि बदल्यांच्या बाबतीत मात्र उलटंच! दरवर्षी ऑनलाइन आणि सुटसुटीत होणाऱ्या बदल्या

यावर्षी ऑफलाईन होणार होत्या! आणि हा विषय बऱ्याच शिक्षक जणांच्या काळजाचा ठोका वाढवित होता. बदल्या होणार आणि त्याही तडकाफडकी! 30 जुलै च्या आत! त्यातच टीयुसी, टीबीआर, कंपल्सरी वॅकन्सी, क्लिअर वेकन्सी, समानीकरणाच्या जागा या सगळ्या याद्या वेगवेगळ्या ग्रुपवर बॉम्बसारख्या धडकू लागल्या! आणि भरीस भर बदल्यांचं पूर्ण वेळापत्रकही जाहीर झालं. आणि प्रत्येक शिक्षक आपली जागा शोधण्याच्या कामी लागला. जवळ-दूर, जूनियर-सीनियर, सुगम-दुर्गम यासारख्या संकल्पना वारंवार चर्चिल्या जाऊ लागल्या. प्रत्येक जण आपापल्या कामाला लागला. सारखा अभ्यास हा तालुका जवळ का तो तालुका जवळ? कोणती शाळा जवळ पडणार? कोणत्या जुनियर ची शाळा मागायची? कोणती शाळा जास्त मिळण्याची शक्यता आहे? या आणि अशा असंख्य अंगाने विचार प्रत्येक जण करू लागले. आणि सहाजिकच आहे प्रत्येक जण आपल्या भल्यासाठी धडपडणारच!

बदलीपात्र आणि बदली इच्छुक शिक्षक बंधू भगिनींची मानसिकताही बदलू लागली की आता आपल्याला जुनी शाळा सोडून जावं लागेल. पुन्हा नवीन गाव, नवीन शाळा, नवीन मुलं, सर्व नवीन गोष्टीशी पुन्हा एकदा ओळख करून घ्यावी लागेल. अन् जुन्या शाळेत घडलेल्या कडू-गोड प्रसंगांच्या एकेक मालिकाच स्मृतीच्या कक्षात येऊ लागल्या. मन मनातच मनाला आवर घालू लागलं! बदली हा तर भाग आपल्या पाचवीलाच पुंजलेला! भेटेल नवीन शाळा सुद्धा चांगली! मिळतील तिथंही चांगली माणसं! गेल्या वर्षीच्या वर्गातील एकन्एक मुलांचा चेहरा दृष्टिपटलावर खिळू लागला! प्रत्येक मूल उदासवाणा होऊन आपल्याकडेच पाहत असल्याचा भास होऊ लागला! घर बदलायचं ! मुलांच्या शाळाही बदलायच्या सगळं सगळं बदल! खरं म्हटलं तर नवीन शाळा मिळेपर्यंत एक खूप मोठं संकट आल्यासारखे प्रत्येकाला वाटत होते.

अशा असंख्य चिंतेच्या गर्तेत शिक्षक बांधव असतानाच थोडीशी एक सुखदच म्हणावी अशी बातमी आली. आणि जिल्हा परिषदेच्या एका विशेष बैठकीमध्ये शिक्षकांच्या बदल्या यंदा रद्द करण्याचा ठराव संमत झाला आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीनिशी प्रेस नोट काढली गेली. आणि 'बदल्या रद्द' ची आनंदाची बातमी मिरगाच्या पहिल्या पावसासारखी भासली. काहींना धक्काही बसला. कुणाचे मनसुबे उधळले! कुणाचे धाबे दणाणले! पण तूर्तास एक वर्ष तरी बदल्या लांबल्या या आनंदात चिंतेला विराम मिळाला! कारण यंदा बहुसंख्य लोकांना बदल्या ऑफलाइन नकोशा वाटत होत्या. अन शेवटी ते झालंही तसंच! म्हणतात ना "देव बरोबर करतो !"



श्री. चंद्रकांत हंगरगे
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा माळझरा
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9403286700

# हिंदी कविता...
# पढना लिखना सिखो।

श्री. सुपलकर श्यामसुंदर
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा शिबदरा म
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 8830059612

बच्चो पढना - लिखना सिखो
जीवन में आगे बढना सिखो ।

जो नियमित पढते जाते
वे निश्चित ही विदया पाते ।

बाधाओं का तो है आना जाना
इससे कभी न तुम घबराना।

पढलिखकर शिक्षित बन जाना
जीवन मे इक मकाम तुम पाना।




पढने से जो करते प्यार
कभी न रहते ओ बेकार।

गर पढने मे कोई बाधा आये
उससे कभी न जी घबराये ।

पढ लिख कर तुम बनो महान
मिलेगा तुम्हे खूब सम्मान ।



श्री. सुपलकर एस.बी.
प्रा. सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा शिबदरा
केंद्र - चिंचगव्हाण ता. हदगांव
मो. 8380977961

# वाचन संस्कृतीत होत चाललेले बदल....

श्री. पोटे बी. डी.
प्राथमिक पदवीधर शिक्षक
जि.प.प्रा.शाळा शिबदरा
केंद्र - चिंचगव्हाण ता. हदगांव
मो. 9822150091

तिमिरातून तेजाकडे नेण्याचे सामर्थ्य केवळ ग्रंथात असते. ग्रंथ हेच गुरु असतात. माणूस परिसाच्या शोधात भटकताना दिसतो. परंतू ग्रंथरुपी परिसाचा जर एखादयाला स्पर्श झाला तर त्याचे सोने व्हायला वेळ लागणार नाही. पुस्तके हे माणसाचे खरी नि:स्वार्थी मित्र आहेत असे म्हंटल तर ते खोट ठरणार नाही कारण आयुष्यातील चढ उताराच्या समयी योग्य मागदर्शन करणारे पुस्तके ही सुदधा आपली मित्रच आहेत. पुस्तकातूनच आपल्याला कधीकधी कोणता मार्ग निवडावा याचे ज्ञान होत असते.



अनेक थोर महापुरुष संत महात्म्यांनी प्राचीन तसेच मध्ययुगीन भारताच्या इतिहासापासून समाजाला पुस्तकांच्या, ग्रंथांच्या माध्यमातून प्रबोधन ज्ञान देण्याचे चांगले संस्कार करण्याचे कार्य केलेले आहे. संत ज्ञानेश्वरांनी भगवतगीतेस प्राकृत भाषेत भाषांतर करुन सर्वांना समजण्यास सोपे करुन सांगितले व समाजास योग्य दिशा देण्याचे काम केले. संत तुकारामांची संतवाणी, संत रामदासांचे मनाचे श्लोक, बहिणाबाईंच्या ओव्या इ हे सर्व साहित्य त्या काळच्या लोकांना मुखोदगत होते. अशा कितीतरी स्वरुपातील साहित्य तेंव्हाच्या लोकांना प्रेरणा दयायचे तसे ते आजही सर्वांना प्रेरणा देतच आहे.


पुस्तके ही माणसे जोडण्याचे कार्य करत असतात. माणसा माणसांतील संवादाचे साधन म्हणजे पुस्तकाकडे पाहिले जाते. पुस्तकातील पात्र व कथानक वाचत असताना कधी कधी व्यक्ती इतके आत्मीयतने पुस्तक वाचते की ती अगदी स्वत:ला त्या पुस्तकातील पात्र समजत असते. ही तर खरी पुस्तकाची जादू आहे. ज्याप्रमाणे पाऊस पडल्यावर जमिनीत पावसाचे थेंब झिरपत जाऊन काळी माती जमिन सुपिक बनते त्याचप्रमाणे पुस्तकरुपी ज्ञान माणसाच्या मेंदूत थेंबाथेंबाने

झिरपत जाऊन मेंदू सुपिक बनविण्याचे कार्य करतो. अर्थात डोक्यात सात्विक व चांगले विचार यांची जडणघडण होण्यास केवळ पुस्तकांमुळेच मदत होते. पुस्तकातून लेखन कौशल्य, वक्तृत्व कला, आत्मविश्वास, ज्ञान, अनुभव, जीवन जगण्याची कला सर्व काही शिकता येते किंबहून पुस्तके या सर्व बाबी आपल्याला शिकवतात, पुस्तके आपले मनोरंजन करत करत बोधप्रद ज्ञान देतात तर कधी आपल्या डोळयात एखादया ज्वलंत विषयावर झणझणीत अंजन देखील घालतात.

चांगला सुसंस्कृत मनुष्य म्हणून जगण्यासाठी पुस्तके ही अतिशय पथदर्शी ठरतात. पुस्तके व ज्ञानाची शिदोरी ही एकप्रकारे अक्षय ज्ञानाची शिदोरी असते. जी की कधीच संपणारी नाही. जगातील कोणत्याही पुस्तकातील ज्ञान भांडार हे कधीच संपणारे नाही. जगातील कोणती संपत्ती श्रेष्ट असेल तर ती पुस्तके आहेत जी कधीच नष्ट होऊ शकत नाहीत. आपण आपल्याला राहण्यासाठी घर बांधत असतोत, परंतू भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या पुस्तकांचे महत्व ओळखून पुस्तके ठेवण्यासाठी घर तयार केले. इतके सामर्थ्य या पुस्तकांमध्ये आहे.

पुस्ताकासारखा खरा गुरु नाही हे निर्विवाद सत्य असले तरी आजची पिढी मात्र पुस्तकांपासून दुरावत जाताना दिसत आहे. आजच्या पिढीला केवळ मनोरंजन हवे आहे त्यामुळे पुस्तके सोडून इतर माध्यमातून ती मनोरंजन शोधत आहेत. ललित लेखन, मनोरंजक कथानक इ असलेले साहित्य आजकालच्या मुलांना भावते त्यासाठी ते त्याचप्रकारची पुस्तके शोधतात. वाचणाची शोध मोहिम ते इंटरनेटच्या माध्यमातून सुरु ठेवतात. इंटरनेटवर एका क्लीक वर त्यांना हवे ते ज्ञान मिळते. जगभरातील अनेक लेखकांची पुस्तके आजकाल इंटरनेटवर सहज उपलब्ध होतात. त्यामुळे ग्रंथालयात जाणे, विविध वाचनालयात जाऊन पुस्तकांचा शोध घेणे या बाबी ते सर्वजन टाळतात. या काही कारणामुळे पुस्तक वाचकांची संख्या कमी होताना दिसून येते. जग कितीही आधुनिक झालं तरी पुस्तके आणि वाचक यांच्यातील नांत हे तसेच कायम राहणार आहे. आधुनिक काळात पुस्तक वाचनाची माध्यम बदलत चालली आहेत. ई बुक्स, डिजिटल बुक्स, मोबाईल बुक्स, लॅपटॉप बुक्स या माध्यमातून पुस्तके वाचणारा वर्ग मोठया प्रमाणात दिसतो.

पुस्तकांचे महत्व ओळखून सर्वांनी वाचनाची सवय अंगीकारुन लोप पावत चाललेली वाचन संस्कृती जपायला हवी. आपल्या पाल्यांना दर महिनाकाठी एक तरी नवीन पुस्तक खरेदी करुन दयावे व ते पुस्तक सर्वांनी मिळून वाचावे.



**श्री. पोटे बी. डी.**
प्रा.प. शिक्षक
जि.प.प्रा.शाळा शिबदरा
केंद्र - चिंचगव्हाण ता. हदगांव
मो. 9822150091

# कविता - शाळाई

**श्री. औरादकर एस. ए.**
सहशिक्षक
जि.प.प्रा. शाळा माळझरा
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9545040143
auradkar135@gmail.com

केंहा येतील सारी पिल्ल
चिवचिव गोंधळ घालतील वर्गात
सारंच कसं चिडीचूप
काय घडलाय साऱ्या जगात

बेलचाही आवाज नाही
प्रार्थनेचा नाही सूर
धांदरट, टपल्या खोड्यांचाही
जिन्यामधून नाही पूर



या पिल्लांनो, या रे लवकर
शाळा तुमची वाट पाहतेय
पण, काळजी घ्या हं स्वतःची
आई म्हणूण तुम्हा सांगतेय

गप्प मैदान केव्हा बोलेल
उडवीत धूळ, घालेल गोंधळ,
पुन्हा डस्टर, खडू यांनी
भरेल कधी प्रेमळ ओंजळ

**श्री. औरादकर एस. ए.**
सहशिक्षक
जि.प.प्रा. शाळा माळझरा
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9545040143
auradkar135@gmail.com

# नविन शैक्षणिक धोरण मसुदा

सोशल मिडीयातील व्हॉटसअप पोस्ट वरुन आपल्या सर्वांच्या माहिती साभार

**संपूर्ण नवीन शैक्षणिक धोरण मसुदा 2019**

**- June 02, 2019**

राष्ट्रीय शिक्षण धोरण मसुदा 2019 भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास खात्याने नवीन शैक्षणिक धोरण 2019 चा मसुदा जनतेसमोर ठेवला असून पूर्व प्राथमिक पासून उच्च शिक्षणापर्यंत अनेक बदल यात सुचविले आहेत. इस्रोचे माजी प्रमुख डॉ. डी. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील 9 सदस्यीय समितीने हा मसुदा तयार केला असून त्यातील काही ठळक तरतुदी खालील प्रमाणे सांगता येतील:

भाग 1

1. पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शिक्षण:

सध्याचा 5+2+3 हा पॅटर्न रद्द करून उच्च माध्यमिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण एकत्र करण्यात आले आहे म्हणजे इयत्ता 9 वी ते 12वी एकत्र करून चार वर्षाचा कोर्स प्रस्तावित आहे ज्यात कला, वाणिज्य आणि शास्त्र असा शाखा निहाय फरक रद्द केला असून एकूण 8 सेमिस्टर चा हा कोर्स असेल ज्यात भाषा, गणित आणि शास्त्र हे विषय बंधनकारक करून इतर कोणतेही विषय आपल्या आवडीनुसार निवडता येतील. पूर्व प्राथमिक शिक्षण वयाच्या तिसऱ्या वर्षांपासून सुरू होईल. अंगणवाडी शिक्षण हे छोटा शिशु आणि मोठा शिशू या वर्गाबरोबर जोडले जाईल. 6 व्या वर्षी मूल पहिलीच्या वर्गात प्रवेश घेईल. स्वतंत्र B.Ed. रद्द करून चार वर्षांचा इंटिग्रेटेड पदवी कोर्स सुरू करण्यात येईल. बारावीनंतर थेट या कोर्सला प्रवेश घेता येईल. आणि हे शिक्षक प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये नियुक्तीसाठी पात्र ठरतील. ज्यांनी इंटिग्रेटेड B. Ed. केलेले नाही ते पदवीनंतर ज्या महाविध्यालात इंटिग्रेटेड B. Ed. आहे त्याच महाविद्यालयात एक वर्षाच्या B. Ed. साठी प्रवेश घेऊ शकतील.व्यावसायिक शिक्षण शालेय शिक्षणात समाविष्ट केले जाईल. इयत्ता सहावी नंतर तीन भाषा शिक्षण पद्धती सुरू केली जाईल. ज्यात स्थानिक भाषेला प्राधान्य दिले जाईल. ज्या प्रदेशात हिंदी बोलली जात नाही त्या प्रदेशात हिंदी भाषा शिक्षणाला प्राधान्य दिले जाईल तर हिंदी भाषिक प्रदेशात इतर कोणत्याही मान्यता प्राप्त भारतीय भाषेला प्राधान्य दिले जाईल.

इंग्रजीला कमी महत्व देऊन तिला तिसऱ्या

क्रमांकाची भाषा म्हणून निवडता येईल किंवा पर्याय म्हणून दुसरी भाषा स्वीकारता येईल. वयोगट 3 ते 8 मधील शिक्षण हे मूलभूत शिक्षण समजले जाईल आणि त्यासाठी बालसुलभ शिक्षण आणि अभ्यासक्रम विकसीत केला जाईल. अंगणवाडीच्या शाळा पूर्वप्राथमिक वर्गाशी जोडल्या जातील तर शक्य असेल तेथे पूर्वप्राथमिक च्या शाळा प्राथमिक शाळेशी जोडण्यासाठी प्रयत्न केले जातील. ज्या ठिकाणी सध्या अस्तित्वात असलेल्या अंगणवाडी आणि पूर्वप्राथमिक शाळा नवीन अभ्यासक्रम राबविण्यात अपयशी ठरतील त्याठिकाणी सर्व सोयींनी युजर नवीन स्वतंत्र पूर्व प्राथमिक शाळा उभारल्या जातील आणि शिक्षणाबरोबर 3 ते 6 वयोगटातील मुलाच्या बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक विकासासाठी आवश्यक सुविधा निर्माण केल्या जातील. 3 ते 8 या वयोगटातील मुलासाठी उपक्रमाधारीत, खेळांच्या माध्यमातून आणि लवचिकता असलेले शिक्षण दिले जाईल. पूर्व प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यत मुलांमध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यावे यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

शाळांमध्ये असलेल्या हुशार मुलांना अपेक्षित शिक्षण मिळावे म्हणून "राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रमा" अंतर्गतदर आठवड्याला पाच तासांचे अतिरिक्त शिक्षण पुरविले जाईल तसेच अपेक्षित क्षमते पेक्षा मागे असलेल्या मुलांसाठी नियमित शाळेच्या वेळेत आणि वेळेनंतरही उपाययोजनात्मक शिक्षण पुरविले जाईल.

प्रत्येक विद्यार्थ्यांकडे नीट लक्ष देता यावे यासाठी विध्यार्थी शिक्षक प्रमाण 30:01 असे ठेवणे. मुलांना स्थनिक भाषेत चांगले शिक्षण मिळावे म्हणून स्थानिक भाषेची जाण असलेल्या शिक्षकांची नियुक्ती करण्याला प्राधान्य देणे.

वाचनाला आणि त्यातुन ज्ञानवृद्धीला प्राधान्य मिळावे म्हणून संपूर्ण देशात सार्वजनिक ठिकाणी आणि शाळांमध्ये ग्रंथालये आणि वाचनकक्ष उभारणे.

मुलांच्या हजेरीवर आणि मानसिक स्थितीवर लक्ष ठेवून त्यात सातत्य राखण्यासाठी प्रत्येक शाळेत एक समाजसेवक आणि एका मानसशास्त्र ज्ञाची नियुक्ती करणे.

अपेक्षित ध्येय गाठण्यासाठी शाळांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा पुरविणे.RTEA त सुधारणा करून करून 2030 पर्यत 12 वि पर्यंतचे शिक्षण या कायद्याखाली आणणे.

जुन्या 5+2+3 ऐवजी नवीन
5+3+3+4 हा आराखडा लागू करणे ज्यात-

1. पहिला टप्पा: पूर्व प्राथमिक ते दुसरी - पाच वर्षे
2. दुसरा टप्पा: तिसरी ते पाचवी- तीन वर्षे
3. तिसरा टप्पा: सहावी ते आठवी - तीन वर्षे
4. चौथा टप्पा: नववी ते बारावी- चार वर्षे

असा आराखडा लागू करणे.

**- सोशम माध्यमातील व्हॉटसअप पोस्ट वरुन केवळ माहितीसाठी सादर**

# माझी शाळा माझी परसबाग

श्री. आंडगे सी. एस.
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा बेलगव्हाण
ता. हदगांव जि. नांदेड
मो. 9657585484

चिटी चावल ले चली
बीच में मिल गई दाल।
कहे कबीरा दो ना मिले,
इक ले डाल ।।

अर्थात मुंगी तांदळाचा दाण घेऊन आनंदाने निघाली पण तितक्यात वाटेत तिला डाळीचाही दाणा दिसला. मुंगी मनात म्हणाली, "क्या बात है देवा ! तु भाताची सोय केलीच होती अन आता वरणाची पण सोय झाली."

एकावेळी दोन्ही दाणे उचलणे मुंगीला शक्य नसल्यामुळे ती खिन्न झाली तेंव्हा कबीर म्हणाले, "वेडाबाई ! तुला दोन्ही गोष्टी नाही मिळणार. तुला भात हवा असेल तर वरणाचा त्याग करावा लागणार, आणि वरण हवे असेल तर भाताचा त्याग करावा लागणार"

ही अशी गोष्ट कबीराचा दोहा सांगण्याचे कारण असे की, माझ्या म्हणजेच सर्वच जिल्हा परिषदेच्या शाळेत येणाऱ्या चिमुकल्या विदयार्थ्यांच्या बाबतीत ही गोष्ट घडत आहे. सर्वच विदयार्थ्यांच्या घरची अवस्था इतकी गरीबीची आहे की त्यांना खायला कधी भात असेल तर वरणाची सोय नाही तर कधी वरण असेल तर भात नाही अशी होत आहे.

अशी परिस्थिती सर्वत्र नेहमी असेल तर मग देशाचा बालक, तरुण निरोगी होऊन बलशाली



भारत कसा बणणार ? का बलशाली भारताचे

स्वप्न हे असेच राहून जाणार ? यावर उपाय म्हणून केंद्र शासन व राज्य शासन यांच्या संयुक्त विदयमाने शालेय मध्यान्ह भोजना कार्यान्वयीत करण्यात आली. ही योजना सर्वच शाळांमध्ये अमलात आणली जाते. पण आपण वास्तववादी विचार केला तर मध्यान्ह भोजन योजनेत किती टक्के विटॅमिनयुक्त, हिरव्या पालेभाज्यायुक्त सकस व पौष्टिक भोजन मुलांना दिल्या जाते ? याचे प्रमाण फार कमी आढळून येईल.

यावर विचार करुन माझ्या मनात विचार आला की, शालेय पोषण आहारातील खिचडी व वरण भात यामध्ये वापरला जाणारा भाजीपाला व हिरव्या



पालेभाज्या नियमित वापरणे, नियमित बाजारातून खरेदी करुन आणणे जोखमीचे काम आहे. तसेच सर्व ऋतूत कमी पैशात भाजीपाला मिळणे कठीण आहे. भाजीपाल्याचे दर किंमती तर दरवेळेस गगनाला भिडणारे असतात. अशावेळी भाजीपाला खरेदी करणे व शालेय पोषण आहारात खाऊ घालणे अवघड आहे.

याच ध्येयाने पछाडून मी ठरवले की शाळेतच रिकाम्या जागेत आपणच भाजीपाला लागवड केली तर कसं होईल ? ही बाब प्रत्यक्षात उतरवली. अन पाहता पाहता गावकऱ्यांच्या व विदयार्थ्यांच्या सहकार्याने शालेय परसबाग तयार करण्याचे काम हाती घेतले. अन

पाहता पाहता काही दिवसात आमची परसबाग तयार सुदधा झाली.

या परसबागेत दररोजच्या शालेय पोषण आहारासाठी लागणारे कोथिंबीर, अद्रक, कडिपत्ता, पालक, मेथी, बटाटे, टोमॅटो सर्व काही कोणत्याही रासायनिक खताशिवाय सेंद्रिय खताचा वापर करुन लागवड करण्यास सुरुवात केली. व आलेल्या भाजीपाल्याचा नियमित शालेय पोषण आहारात वापर करणे सुरु झाला.

विदयार्थी देखील मध्यांतर वेळेत तसेच शालेय वेळेनंतर या परसबागेची खूप आपुलकीने काळजी घेऊ लागली. पालेभाज्यांना पाणी देणे, लहानलहान रोपांची काळजी घेणे, मातीचे छोटे छोटे आळे तयार करणे, यासह अनेक छोटया छोटया बाबीतून मुले भाजीपाला लागवड करणे शिकू लागली. मुलांचा व गावकऱ्यांचा उत्साह पण खूप दिसत होता. पालेभाज्यांसोबत फळभाज्यांची पण लागवड सुरु केली. पपई, पेरु यासारखे फळे आमच्या शालेय परसबागेत सर्वांना आनंद देऊ लागले.

परसबाग तयार केली पण त्याची काळजी घेणे व त्यातील सातत्य टिकवून ठेवणे ही बाब महत्वाची आहे. सर्व गावकरी व विदयार्थी यांच्या सहकार्याने यातील सातत्य टिकून आहे.

या सारख्या छोटयाशा परसबागेची निर्मिती करणे प्रत्येक शाळेत सहज शक्य आहे. गरज आहे ती फक्त आपल्या छोटयाशा इच्छा शक्तीची. आपल्या मनात अशी छोटीशी इच्छाशक्ती निर्माण झाल्यास आपण वाळवंटातही नंदनवन फुलवू शकता. ही तर छोटीशी परसबागच आहे.

या परसबागेच्या निर्मितीमुळे मला एक आत्मिक सुख व समाधान लाभत. कारण जिथे ग्रामीण भागातील प्रत्येक घराघरात भाजीपाल्याची वाणवा आहे. गरीबाघरच्या लेकरांना नीट दोन वेळचे जेवायला मिळत नाही त्यांना दरदिवशी वेगवेगळा भाजीपाला कुठून मिळणार. या सर्व लेकरांना शालेय पोषण आहाराच्या माध्यमातून शाळेत सेंद्रिय पदधतीने पिकवलेला भाजीपाला खायला मिळतो. सर्व विदयार्थी शालेय पोषण आहारातील खिचडी असो की वरणभात असो तो पदार्थ पहिल्यांदा वाढलेला संपवून अगदी आनंदाने दुसऱ्यांदा पण घेऊन खातात. याहून दुसरे आत्मिक सुख अजून कोणते ?

बस्स हा एक छोटासा प्रयत्न माझ्या शाळेचा परसबागेचा... आपण नक्की याल आमच्या जि.प.प्रा.शाळा बेलगव्हाण शाळेला भेट दयायला मी वाट पाहतोय. धन्यवाद....




***श्री. आंडगे सी. एस.***

*सहशिक्षक*

*जि.प.प्रा.शाळा बेलगव्हाण*

*ता. हदगांव जि. नांदेड*

*मो. 9657585484*

# माझी शाळा -माझा उपक्रम

## फाईव्ह स्टार *****

श्री. सर्पे बी. एम.
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा कवाना
ता. हदगांव जि. नांदेड
मो.9422563738

### विदयार्थ्यांमध्ये स्वच्छता व निटनेटकेपणा रुजावा यासाठी एक छोटासा उपयुक्त उपक्रम..

ग्रामीण भागात विविध स्तरामधून विदयार्थी शाळेत येत असतात. ग्रामीण भागामध्ये आर्थिक शैक्षणिक, सामाजिक मागासलेपणा प्रकर्षाने जाणवतो. त्या मागास वर्गातील तळागाळातील बालकांना चांगल्या व आरोग्यदायी सवयी लावणे यासंदर्भात सर्व शिक्षकांपुढे एक मोठे आव्हान निर्माण होत असते. प्रामुख्याने ग्रामीण जिल्हा परिषद शाळात विदयार्थ्यांच्या आरोग्याच्या बाबतीत खाली समस्या आढळून येतात.

* **काही मुले आंघोळ/स्नान न करता शाळेत येतात.**
* **काही मुले केस विंचरत नाहीत.**
* **काही मुलांची नखे खूप वाढलेली असतात. नियमित नखे कापत नाहीत.**
* **काही मुले अस्वच्छ कपडे घालतात.**
* **काही मुले घरुन येताना मातीत खेळतात व कपडे लगेच खराब करुन टाकतात.**

या व यासारख्या अनेक समस्या विदयार्थ्यांमध्ये दिसून येतात. या समस्या दिसुन येणाऱ्या विदयार्थ्यांना चांगल्या आरोग्याच्या सवयी, लागाव्यात, स्वच्छता, निटनेटकेपणा या मुल्यांची त्यांच्यात रुजवणूक व्हावी म्हणून आमच्या **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवाना ता. हदगांव** शाळेने एक उपक्रम हाती घेतला व तो उपक्रम राबविला. सदरील उपक्रमाला चांगल्या प्रकारे प्रतिसाद देखील मिळाला. सर्व मुले मुली अर्थात विदयार्थी रोज नीटनेटके, स्वच्छ व टापटीपपणे गणवेशात शाळेत येताना दिसून आली.

उपक्रमाचे नांव :-

### (आजचे Five star *****)

हा उपक्रम आम्ही आमच्या शाळेत खालील प्रमाणे राबविला.

दररोज शाळेत सकाळी परिपाठ संपला की, सर्व 1 ते 7 वर्गातील मुला-मुलींचे पोषाख, केस, हाताची पायाची नखे, हात पाय, निटनेटकेपणा टापटीपपणा या सर्व बाबींचे दहा मिनिटे सर्वांनी निरीक्षण करायचे. त्या सर्व विदयार्थ्यांमधून जे विदयार्थी स्वच्छ, टापटीप, निटनेटके शाळेत आलेले

आहेत. अशा विदयार्थ्यांचा शोध घेऊन त्या पाच विदयार्थ्यांना समोर बोलवायचे आणि त्या विदयार्थ्यांना त्या दिवसाचे 5 ***** (Five Star) घोषित करायचे. त्यांच्या छातीवर आजचे फाईव्ह स्टार असे बिल्ले लावायये. तसेच शाळेच्या दर्शनी फलकावर त्या दिवशी दिवसभर सर्वांना दिसतील अशा प्रकारे त्यांची नावे लिहायची. शाळेतील सर्व विदयार्थ्यांसमोर त्यांना बोलावून त्यांचे तीन टाळया

मला शाळेत दिवसभर स्वच्छ व निटनेटके राहायचे आहे आहे याबाबी कडे सर्वजन आवर्जून लक्ष देऊ लागली.

या उपक्रमाची फलश्रुती आम्हाल लगेचच पहायला मिळाली. अवघ्या तीन ते चार आठवडयात सर्व मुले मुली एकदम स्वच्छ, टापटीप व निटनेटके पणाने गणवेशात शाळेत येऊ लागली. दिवसभर शाळेत निटनेटकेपणाने राहू लागली. या उपक्रमामधून त्यांना स्वच्छता, निटनेटकेपणा, आरोग्य




वाजवून स्वागत करायचे. पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दयायच्या. याप्रमाणे दररोज पाच पाच विदयार्थी निवडून हा उपक्रम नित्य व नियमित पणे राबविला.

या उपक्रमाच्या अंमलबजावणीमुळे सर्व विदयार्थ्यांमध्ये एक निकोप स्पर्धा निर्माण झाली. सर्व विदयार्थ्यांना वाटू लागले की मी ही आजचा फाईव्ह स्टार व्हावे. माझे ही आजच्या फाईव्ह स्टारच्या फलकावर नाव यावे. अशी चढाओढ सर्व विदयार्थ्यांमध्ये निर्माण झाली. सर्व विदयार्थी मी स्वत: कसा स्वच्छ, निटनेटका, टापटीप दिसेल.

व आरोग्याच्या चांगल्या सवयी याबाबी त्यांच्या अंगी आपोआप रुजल्या व त्यांना पुन्हा वेगळ असे शाळेत निटनेटके या म्हणून सांगायची आवश्यकता भासली नाही.



*श्री. सर्पे बी. एम.*
*सहशिक्षक*
*जि.प.प्रा.शाळा कवाना*
*ता. हदगांव जि. नांदेड*
*मो.9422563738*

# भारतीय स्वातंत्र्य

श्रीमती. वैशाली प्रल्हाद धांडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा रुई (धा.)
केंद्र -भानेगांव ता. हदगांव
मो. 9689213411

व्यापारासाठी आले आणि राज्यकर्ते बनले असे हे इंग्रज भारत देशात व्यापार करण्यासाठी आले होते. त्याकाळी भारत देश हा फार सधन होता. त्याकाळी भारताला "सोने की चिडिया"




असे म्हणत असत. भारतातून सोन्याचा धूर निघत होता अशा प्रकारे भारताच्या संपन्नतेचे वर्णन केले जायचे. भारत देशात होणारे मसाल्याचे पदार्थ हे फार चांगल्या दर्जाचे असल्यामुळे या पदार्थांना जगात चांगली मागणी होती. भारत देश हा अनेक छोटया छोटया संस्थानात, राज्यांत वाटल्या गेला होता. भारतातील जास्तीत जास्त लोक हे अशिक्षित, अप्रगत होते. राज्यकर्त्यांत आपापसात भांडणे चालू होती. भारतीयांना पाहिजे तशी एकी नव्हती. भारतीयांच्या या अज्ञानाचा व परस्परातील भांडणे यांचाच फायदा परकीय सत्तांनी घेतला. परकीयांकडे प्रगत ज्ञान व अदययावत शस्त्रास्त्रे होती. त्याचा फायदा त्यांना झाला. अशारितीने इंग्रज भारतात व्यापारासाठी आले त्यांनी इ.स. १६०० मध्ये "इस्ट इंडिया कंपनी" स्थापन केली आणि आले आपले बस्तान भारतात मांडले. व्यापार करता करता आपले राजकीय वर्चस्व त्यांनी भारतात निर्माण केले.

इंग्रजांनी फार मोठया प्रमाणात भारताची लूट केली आणि संपत्ती आपल्या मायदेशी नेली. इंग्रज राज्यकर्ते अतिशय क्रूर होते. भारतीय जनतेबददल ज्या राज्यकर्त्यांच्या मनात कणव नव्हती. केवळ भारतीयांचे आर्थिक शोषण करणे आणि आपल्या मायभूमीला सधन बनविणे हाच प्रत्येक इंग्रज अधिकाऱ्याचा हेतू होता आणि त्यासाठी ते भारतातील शेतकऱ्यांवर फार मोठया प्रमाणात कर लादत असत. भारतातून कच्चामाल परदेशात नेऊन तिथे त्या कच्च्या मालापासून पक्का माल तयार करुन तो अधिक किंमतीत भारतात विकणे.

मीठासारख्या जीवनावश्यक गोष्टीवर कर लावणे. भारतीयांना कसल्याच प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते जिकडून तिकडून भारतीयांची पिळवणूक होत होती. भारतीय जनता ही अशिक्षित अज्ञानी होती त्यामुळे इंग्रजांना राज्यकारभार करण्यात अडसर येत होता. त्यामुळे त्यांनी भारतीयांना सुशिक्षित करण्यासाठी शाळा सुरु केल्या. भारतीय मुले शिकू लागली व त्यांनी अभ्यासाने स्वातंत्र्याचे महत्व ओळखले. हळूहळू भारतात अनेक क्रांतिकारक निर्माण इ ाले, ज्यांच्या मनात इंग्रजांविषयी तिव्र असंतोष होता. त्यांनी भारतभू ला स्वातंत्र्य करण्यासाठी आपल्या घरादाराचा, सुखाचा त्याग केला. जुलमी इंग्रजांची हत्या करणे, जनतेची गाऱ्हाणी मांडणे, आपले हक्क मिळवणे इत्यादी कार्यासाठी त्यांनी प्रसंगी आपले प्राण पणाला लावले.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला. त्यांनी जर स्वत:चा स्वत:च्या जीवाचा विचार केला असता तर आपण आज जो स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत, निर्भिडपणे जीवन जगत आहोत. ते आपल्या वाटयाला आले नसते.

क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी किती धडपड केली, किती दु:ख कष्ट सहन केले त्याचा आज विचार होणे फार आवश्यक आहे. ज्यांच्या हौतात्म्याने आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले, त्या भारत देशाची आपण म्हणावी तशी प्रगती करु शकलो का ? भ्रष्टाचार, जातिभेद, बेरोजगारी, दारिद्रय, अत्याचार या समस्या विचारात घेतल्यातर स्वातंत्र्य मिळवून काय फायदा झाला ? हा प्रश्न आपल्या समोर उभा राहिल. त्या क्रांतिकारकांच्या बलिदानाला अर्थच उरणार नाही. आपल या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे मोल राखायचे असेल तर आपण आपल्या मनातदेखील त्यांच्या प्रमाणे देशभक्ती निर्माण करुन आपल्या समाजाच्या, देशाच्या विकासासाठी हातभार लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक नागरिकाने आपल्या देशाशी इमानदारीने कर्तव्य पार पाडल्याने आपल्या देशात ज्या समस्या निर्माण झाल्या. त्या लोप पावतील व आपल्या देशाचा नक्कीच विकास होईल. प्रत्येकाला विकासाच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत त्यासाठी आपणास योग्य राजकीय नेतृत्व मिळणे आवश्यक आहे यासाठी भारतीय नागरिकांनी योग्य नेता निवडणे आवश्यक आहे नसता कुचकामी राजकीय व्यवस्था उलथून पाडण्याची जबाबदारी त्यांचीच आहे. हे स्वातंत्र्य टिकवून ठेवणे व देशाचा विकास करण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयाची आहे.



*श्रीमती. वैशाली प्रल्हाद धांडे*
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा रुई (धा.)
केंद्र -भानेगांव ता. हदगांव
मो. 9689213411

# कविता - येता पावसाच्या सरी

श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा गोजेगांव
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9403046894

येती पावसाच्या सरीवर सरी
आनंदून जाईल धरती सारी
येती पावसाच्या सरीवर सरी
वाहती नदया- नाल्या दूथरी
बोलू लागती पशू - पक्षी सारी




चोही बाजू हिरवळ पसरी
येती पावसाच्या सरीवर सरी
रान दिसती हिरवी हिरवी
ओल्या मातीतल्या गंधातुनी
सुगंध पसरी मंद - मंद वाऱ्यातूनी

येती पावसाच्या सरीवर सरी
पोरं खेळती बागडती
पाण्यातही भिजती, नाचती
अंगणात आनंदाने सारी

येती पावसाच्या सरीवर सरी
मोर नाचती पिसारे फुलवुनी
झाडी, वेली रानामाळातुनी
फुल बहरती रंगारंगातुनी

येती पावसाच्या सरीवर सरी
पेरणी करती मग शेतकरी
पिके डोलारती रान सारी
नांदेल मग लक्ष्मी घरीदारी
येती पावसाच्या सरीवर सरी
आनंदून जाईल धरती सारी



श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा गोजेगांव
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9403046894

# दप्तराविना शाळा

श्रीमती.अर्चना इटकरे - हराळे
सहशिक्षिका
जि.प.प्रा. शाळा रुई (धा.)
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9420539611

विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे; त्याचा सर्वांगीण विकास व्हावा हा मुख्य उद्देश डोळ्यांसमोर ठेवून शिक्षक आपले कार्य करत



असतात. पण तरीही काही विद्यार्थी मात्र शाळा परिणामत: शिक्षणापासून दूर राहतात. त्याची कारणे विद्यार्थ्यांनी नुसार वेगवेगळी असू शकतात. यातील बऱ्याच विद्यार्थ्यांना शाळेत जाणे नको वाटते; कारण शाळेत जायचं म्हटलं की दप्तर आलं, दप्तर म्हटलं की त्यात वह्या-पुस्तके येणार आणि पुस्तके म्हटलं की अभ्यास आला. अभ्यास केला नाही की शिक्षकांची किंबहुना शाळेत जायची भीती वाटते. म्हणूनच विद्यार्थी रविवारची किंवा इतर सुट्टीची आतुरतेने वाट पाहतात.

विद्यार्थ्यांच्या या मानसिकतेचा विचार करून सर्व विद्यार्थ्यांना शाळेविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठी "दप्तराविना शाळा" हा उपक्रम शाळेत राबविण्याचा प्रस्ताव ठेवताच शाळेत सर्वांनी होकार दर्शवला. अशाप्रकारे आमच्या शाळेत शनिवार "दप्तराविना शाळा" हा उपक्रम सुरु झाला.

शनिवार दप्तराविना शाळा घ्यायची पण दप्तर नाहीतर मग विद्यार्थ्यांनी शाळेत येऊन करायच काय? अशा वेळी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात पूरक असे उपक्रम घेण्याचे ठरले. यातील काही उपक्रम हे मैदानावरील होते, तर काही उपक्रम हे वर्गातील होते. काही उपक्रम हे सांघिक स्वरूपाचे होते तर काही वैयक्तिक स्वरूपाचे होते. यात गीत व कविता गायन, प्रश्नमंजुषा, कोडी सोडवणे, गोष्टी सांगणे, ग्रंथालयातील पुस्तके वाचन करणे, शाळेतील उपलब्ध साहित्याचा वापर करून वेगवेगळे आकार व वस्तू बनवणे, नाट्यीकरण करणे, विविध गुणदर्शन दाखवणे, कागदी व मातीच्या वस्तू बनवणे,

चित्र काढणे, चित्र रंगवणे, सामूहिक कवायत, योगासने, खेळ खेळणे, शब्दांच्या भेंड्या, वृक्षलागवड



करणे, वृक्ष संवर्धन करणे, बाल सभा आनंद मेळा, निसर्ग सहल, शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ करणे, विविध स्वरूपाच्या स्पर्धा इत्यादी उपक्रम "दप्तराविना शाळा" या दिवशी घेण्यात येत.

दप्तराविना शाळा या दिवशी सर्व विद्यार्थी आनंदाने शाळेत येत. दप्तर नसल्याने विद्यार्थ्यांचा मानसिक ताण कमी झाला व खऱ्या अर्थाने विद्यार्थी आनंददायी शिक्षण घेऊ लागले. तसेच या दिवशी घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक कौशल्य विकसित होऊ लागली .शनिवारी घेण्यात येणाऱ्या उपक्रमाविषयी विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता असे. अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शाळेविषयी आवड निर्माण झाली व त्यांची शाळेतील उपस्थिती वाढू लागली.

इतर जिल्ह्यातील बर्याच शाळांमध्ये सुरू असलेला दप्तराविना शाळा या उपक्रमास पालकांच्या व अधिकाऱ्यांच्या काय प्रतिक्रिया मिळतात याची धास्ती होती. पण दोघांकडूनही या उपक्रमास



चांगल्या प्रतिक्रिया मिळाल्या. विस्तारअधिकारी आदरणीय श्रीमती आडगावकर मॅडम यांनी कौतुक केले. नंतर हा उपक्रम त्यांच्या मार्गदर्शनाखाली भानेगाव केंद्र व संपूर्ण बरडशेवाळा बीटमध्ये राबवण्यात आला.



**श्रीमती. अर्चना इटकरे - हराळे**
सहशिक्षिका
जि.प.प्रा. शाळा रुई (धा.)
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9420539611

# कविता -
# मोबाईल आणू तरी कुठून..

श्री. भंडारे योगेश
सहशिक्षक
जि.प.प्रा. शाळा पिंपरखेड
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9960204809

परिस्थिती नाही मायी
गेलो पूरा तुटून,
सांगा गुरुजी मोबाईल मी
आणू तरी कुठून...

एकाएकी कोरोनाची
महामारी आली,
महामारी आली अन
आमची पंचाईत झाली,
कामधंदा हातातला
गेला माया सुटून
सांगा गुरुजी मोबाईल मी
आणू तरी कुठून...

खायले नाही घरात माया
जवारीचा दाणा,
लेकरं मनते मले बाबा
मोबाईल आणा,
लेकरांनी मागणी त्यांची
अशी धरली रेटून
सांगा गुरुजी मोबाईल मी
आणू तरी कुठून...

शेतीवाडी नाही आमची
काम नाही मोठं,
मजूरीच्या भरोश्यावर
आहे आमचं पोटं,
पोट भागून जराशे
पैसे शिल्लक पाडतो,
त्याच्यातच अडचणीचे
दिसं आमी काढतो
लॉकडाऊनच्या काळामंदी
तेच कामी आले
होते काही गुरुजी जमा
सारे खर्च झाले
होत नव्हतं कोरोनाने
नेलं सारं लुटून
सांगा गुरुजी मोबाईल मी
आणू तरी कुठून...

शेजारी एक दिवस
पोरगी मायी गेली,
अभ्यासाले हातामंदी
पेन वही नेली
शेजारीन राजेहो
अशी गरम झाली
म्हणे कोरोनाची साथ आहे
इथे कायले आली
असं कस मने तुमी
ध्यानात घेत नाही
असं घरी कोणाच्याबी
जाता येत नाही
पोरीले गुरुजी माया
दिले तीने उठून
सांगा गुरुजी मोबाईल मी
आणू तरी कुठून...

घडी घडी डोयातला
बांध येतो फुटून
सांगा गुरुजी मोबाईल मी
आणू तरी कुठून...

श्री. भंडारे योगेश
सहशिक्षक
जि.प.प्रा. शाळा पिंपरखेड

# क्रांतीचा सूर्य...

सौ. गुंटूरकर आर. एन.
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा करमोडी
केंद्र -चिंचगव्हाण ता. हदगांव
मो. 9767466712

एक ऑगस्ट दिवस उजाडला
वाटेगावी जन्म अण्णांचा झाला
आनंद झाल्या माझ्या जीवाला
पद दलितांचा वाली जन्मला

स्फूरण स्फूरले नव विचाराला
तळागाळातला माणूस जागा झाला
जागृत झाली अबला
पुरुष लढवय्या झाला

धार चढवून लेखणीला
प्रतिकार अन्यायाला केला
फकीरासतू भोसले नी बंड पुकारला
हाकलून दिले इंग्रजांना

शोधला माणूस माणसातला
फकीराला न्याय मिळवूनी दिला
तू शार्क शोध घेणारा तळाचा
तू डरकळणारा वाघ वारणेचा

कास धरुनी साम्यवादाची
चळवळ चालवली कामगारांची
जागृत केले कामगारांना
हैराण केले भांडवलदारांना

फडकवली शाहीरी डफावर
सरसावले कामगार मैदानावर
चळवळ चालली संयुक्त महाराष्ट्राची
कास धरली देशाच्या अखंडतेची

संदेश दिला समतेचा
संदेश दिला अखंडतेचा
संदेश दिला मानवतेचा
संदेश दिला ऐक्याचा

उदधार केला भाऊरावांचा
पांग फेडला वालू मातेचा
तू आहेस खळवळलेला दर्या
तू क्रांतीचा तळपता सूर्या...!
तूच क्रांतीचा तळपता सूर्या...!

सौ. गुंटूरकर आर. एन.
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा करमोडी
केंद्र -चिंचगव्हाण ता. हदगांव
मो. 9767466712

# पिंक रिबन......

श्री. सुपलकर एस.बी.
प्रा. सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा शिबदरा
केंद्र - चिंचगव्हाण ता. हदगांव
मो. 8380977961

अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातील एका शिक्षिकेने तिच्या वर्गात एक प्रयोग करायचे ठरवले. वर्षभर अभ्यास करुन झाल्यावर मुले पास होऊन दुसऱ्या वर्गात जात असतात तेंव्हा तीने वर्गातील प्रत्येक विदयार्थ्यांच्या शर्टवर एक **पिंक रिबन** नावाचा टॅग लावला. त्या रिबनवर अतिशय सुंदर अशा ओळी लिहिल्या होत्या. ''Who are You? Makes my life Difference'' अर्थातच ''तुझ्या असण्यामुळे (माझे) आयुष्य बदलले आहे.'' म्हणजेच एका शिक्षिकेने सर्व विदयार्थ्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना एक सन्मान प्रदान केलेला होता.

हा सन्मान पाहून व तो संदेश वाचून सर्व विदयार्थ्यांना खूप खूप आनंद झाला. माझ्या वागण्यामुळे, वर्तनामुळे, माझ्या असण्यामुळे आमच्या मॅडमच्या आयुष्यात फरक पडला, असे सर्व विदयार्थी विचार करु लागले. या रिबन शिवाय त्या शिक्षिकेने प्रत्येक विदयार्थ्याला अजून तीन तीन रिबन दिल्या व एक प्रेमळ सूचनावजा सल्ला दिला,''ही रिबन येथून जाताना घेऊन जा व तुमच्या आयुष्यातल्या महत्वाच्या व्यक्तीला धन्यवाद व्यक्त करुन तिच्या ड्रेसवर/शर्टवर एक रिबीन लावा. व उर्वरित दोन रिबीन पैकी एक रिबीन त्या व्यक्तीला त्यांच्या आयुष्यात महत्वाच्या वाटणाऱ्या व्यक्तीला तिचे आभार मानून लावायला सांगा.'' असे शिक्षिकेने सर्व मुलांना सांगितले.

शाळेतील सूचना ऐकून सर्व विदयार्थी आपापल्या घरी आले. एका विदयार्थ्यांने त्याच्या घराशेजारच्या एक तरुणाच्या शर्टवर, ''धन्यवाद तुमच्या मुळे माझ्या आयुष्यात खूप बदल झाला'' असे म्हणत हा रिबीन लावला. तो शेजारचा तरुण एका कंपनीत कामाला होता. त्याने या विदयार्थ्याला अभ्यासात वेळोवेळी मदत केलेली असते त्यामुळे या विदयार्थ्यास परिक्षेत चांगले गुण प्राप्त झालेले असतात.

विदयार्थ्याने उर्वरित दोन रिबीन त्या तरुणला दाखवत सांगितले, ''आम्ही आमच्या शाळेत एक प्रोजेक्ट करतो आहोत, तुमच्या आयुष्यात ज्या माणसामुळे बदल झाला आहे त्यांना त्यांचे आभार माणून हा रिबन लावायचा आहे, यापैकी एक रिबन तुम्ही तुमच्या महत्वाच्या व्यक्तीला लावाल का ?''

तो तरुण कर्मचारी लगेच तयार झाला व त्याने ते दोन्ही रिबन घेतले. दुसऱ्या दिवशी तो आपल्या ऑफिसातील बॉस जवळ जाऊन बॉसचे आभार मानत, "You made me difference in my life" असे म्हणून तो पिंक रिबन बॉस च्या शर्टला लावला. बॉस अत्यंत हूशार, चलाख होता. सर्व कंपनी त्याच्यामुळे चालत आहे हे त्याला माहित होते. तो बॉस जसा हूशार म्हणून प्रसिदध होता तसा तो खडूस म्हणूनही परिचित होता. बॉसने कित्येकदा त्या तरुण कर्मचाऱ्याला कामाच्या बाबतीत रागावले होते. पण तरीही कर्मचाऱ्याने त्याला पिंक रिबन लावून आभार मानल्यामुळे बॉसच्या डोळयात टचकन पाणी आले. तो म्हणाला, "माझ्यामुळे तुझ्या आयुष्यात इतका बदल झालाय ? तुझ्यासाठी मी इतका महत्वाचा आहे, हे मला माहितच नव्हते."

त्या तरुण कर्मचाऱ्याने विचारले,"ही कल्पना माझी नाही तर एका शाळेतला हा प्रोजेक्ट आहे, आपल्या आयुष्यात बदल करणाऱ्या लोकांना धन्यवाद देऊन त्यांना ही पिंक रिबन लावायची. तुम्हाला आवडेल का असे करायला ?" त्यावर बॉस लगेच म्हणाले,"होय का नाही, नक्की असे करायला मला आवडेल. आहे का तुझ्या कडे अजून एखादी रिबन" त्यावर त्या तरुण कर्मचाऱ्याने उरलेली पिंक रिबन बॉसला देऊन टाकली.

त्या दिवशी बॉस आफिसातून घरी लवकर गेले. त्याने आपल्या मुलाला बोलावले. मुलाच्या शर्टवर पिंक रिबन लावत तो आपल्या मुलाला म्हणाला," मी नेहमी कामामुळे उशिरा घरी येतो, घरी आल्यावर माझी चिडचिड होते, मी कधीकधी तुझ्याशी प्रेमाने बोलत नाही, मी आजवर तुला हे कधी सांगितले नाही पण तूझे असणे माझ्यासाठी खूप काही आहे. You Makes a difference in my life"

हे वडिलांचे सर्व बोलणं ऐकल्यावर मुलगा ढसाढसा रडायला लागला. तो म्हणाला, "पप्पा मला वाटायचे की, तुम्हाला मी अजिबात आवडत नाही. तुम्ही मला कधीच वेळ देत नाहीत त्यामुळे मी रागारागाने आज हे घर सोडून निघून जाणार होतो. ही पहा चिठठी. असे करत त्याने चिठठी दाखवली. तो मुलगा पुढे म्हणाला "पप्पा आज तुम्ही मला ही रिबन लावली आणि प्रेमळ हातांनी मायेचा वर्षाव केलात व माझ मन परिवर्तन केलंत, आता मी तुम्हाला सोडून कोठेही जाणार नाही."

वडिलांनी चिठठी वाचली, त्यांनी आपल्या मुलाला घटट पोटाशी धरले. दोघेही एकमेकांच्या मिठीत आनंदाश्रू ढाळत होते. त्या एक रिबनमुळे मुलाला बाबा व बाबांना त्यांचा मुलगा परत मिळाला होता.

**अप्रतिम आयुष्य बिघडवायला वेळ लागत नाही, पण घडवायला मात्र मोठं मन आणि आत्मविश्वास लागतो.**



***श्री. सुपलकर एस.बी.***
*प्रा. सहशिक्षक*
*जि.प.प्रा.शाळा शिबदरा*
*केंद्र - चिंचगव्हाण ता. हदगांव*
*मो. 8380977961*

# विभाग ब मान्यवर आपल्या भेटीला...

या अंकापासून आपल्या भेटीला आपल्या बरडशेवाळा बीटच्या व्यतिरिक्त जिल्हयात इतर कोणत्याही शाळांत कार्यरत शैक्षणिक क्षैत्रातील विविध मान्यवर शिक्षक यांचे शैक्षणिक घडामोडी, शैक्षणिक बदल, अध्यायन अध्यापन प्रक्रिया, प्रशिक्षण पदधती, माहिती तंत्रज्ञान या विषयावर आधारित लेख प्रकाशित केले जाणार आहेत व ते आपणा सर्वांना वाचायला मिळणार आहेत.

# विदयार्थी हित साधणारा पाठयपुस्तकातील बदल

श्री. धोबे सुनिल गंगाधर
प्राथमिक शिक्षक
जिल्हा परिषद नांदेड
मो.9421948864

**अभ्यासक्रम पाठयक्रम निर्मिती तथा विविध प्रशिक्षणाच्या माध्यमातुन सर्वांना सुपरिचीत असणारे श्री. सुनील धोबे सर यांच्या लेखणीतून अवतरलेला हा लेख आपल्या समोर येत आहे. श्री. धोबे सर हे एक उपक्रमशील तंत्रस्नेही आदर्श व्यक्तिमत्व असलेले शिक्षक आहेत. विविध शैक्षणिक घडामोडीवर त्यांचा चांगला अभ्यास आहे. विविध विषयावर लेख, कविता, समीक्षा, परीक्षण याबाबत त्यांचे लिखान कार्य उत्तम आहे. एकात्मिक व द्विभाषिक पाठयपुस्तक या पथदर्शी उपक्रमा विषयी माहिती देणारा हा लेख...**

## मानव संसाधनाच्या विकासाचा गाभा म्हणजे शिक्षण

***1964 च्या कोठारी आयोगापासून*** ते आजवर अभ्यासक्रमात, अध्यापनात, पाठयक्रमात अनेक बदल होत गेले. शिक्षण पदधती, अध्यापन पदधती यावर नवनविन प्रयोग होत गेले. **1986 ची शिक्षा निती ते 2005 चे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा** या साऱ्यांचे सार हे शिक्षण देशाची, सामाजिक स्थिती व आर्थिक दृष्टया संतूलन आणण्यासाठी कसे उपयोगी ठरेल यावर भर देण्यात आला.

1992 साली शासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालय अंतर्गत नेमण्यात आलेल्या प्रसिदध वैज्ञानिक, शिक्षणतज्ञ प्राध्यापक श्री. यशपाल यांच्या अध्यक्षतेखाली **यशपाल समितीने** ज्या शिफारशी मांडल्या त्या खूप महत्वाच्या होत्या. त्यातील अनेक शिफारशींपैकी एक महत्वपूर्ण बाब म्हणजे,

**मुल दुहेरी ओझ्याखाली दाबल्या जात आहेत, एक शिक्षणातील अनेक किचकट संकल्पना व दुसरे म्हणजे दप्तराचे ओझे.**

यातील अभ्यासक्रम मुलांच्या पातळीपर्यंत आणण्यात अनेक प्रयत्न झाले. याचाच परिपाक म्हणजे सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन (CCE) ज्यात केवळ विदयार्थ्यांच्या स्मरणशक्तीला वा परीक्षेला महत्व प्राधान्य न देता त्यांच्या अंगी असणाऱ्या गुणांना निरीक्षणाद्वारे गुण देण्यात येत आहेत

यशपाल समितीने मांडलेल्या शिफारशीपैंकी महत्वाची बाब म्हणजे **ओझ्याविना शिक्षण(Learning without burden)**. हे ओझे दोन्ही प्रकारचे शिक्षण

आनंददायी पदधतीने शिकवण्याऐवजी अवघड करुन मांडले जात व दुसरे ओझे म्हणजे पाठीवरील दप्तराचे ओझे ज्या खाले नविन पिढी शोषक होत दबून जात होती. समितीने मांडलेला महत्वाचा मुददा-

**प्राथमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या दप्तराचे ओझे 4 किलो पेक्षा जास्त नसावे.**




यशपाल समितीच्या 1993 ला आलेल्या अहवालानंतर अनेक उपाय करण्यात आले. मात्र हे ओझे कमी करण्यासाठी कायम असा उपाय मिळत नव्हता. अनेक संस्था शाळा, शिक्षक यांनी काही पर्याय शोधले.

**काही उपाय -**

* वेळापत्रकानुसार तासिका असतील त्याच विषयाची पुस्तके विशिष्ट दिवशी घेऊन येण्याचा नियम केला.
* काही शाळांनी शाळेतच पुस्तके ठेवण्याचा नियम केला.
* गृहपाठाच्या वहया शाळेत ठेवणे.
* SMS, Social Medea द्वारे गृहपाठ देणे.

मात्र या उपायांच्या अंमलबजावणीवर अडथळे येत. सर्व पर्यायावर विचार करुन **महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे** यांनी **एकात्मिक व द्विभाषिक पाठयपुस्तकांची निर्मिती** केली. उपलब्ध पाठयपुस्तकांनाच वेगळे स्वरुप देत ओझ्याविना शिक्षण या संकल्पनेला साजेसा बदल घडवून आणला.

**एकात्मिक व द्विभाषिक पाठयपुस्तक** या पथदर्शी प्रकल्पाच्या माध्यमातून **शैक्षणिक वर्ष सन 2020-2021 करीता नविन पाठयपुस्तक वितरणासाठी नांदेड जिल्हयातील हदगांव तालुका निवडण्यात आला** व माहे जुलै 2020 महिन्याच्या सुरुवातीस ही पाठयपुस्तकं विदयार्थ्यांच्या हाती दिली आहेत.

एकात्मिक व द्विभाषिक पाठयपुस्तक संपूर्ण राज्यालाच नव्हे तर देशाला पथदर्शक प्रकल्प ठरणार आहे.

इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या सर्वच वर्गांसाठी हया एकात्मिक व द्विभाषिक पाठयपुस्तकांची निर्मिती करण्यात आली आहे.

अनेकांना वाटणे सहाजीक आहे की, सर्वच विषयांची पुस्तके एकत्र केल्यास अनेक समस्या निर्माण होतील, जसे पाठयपुस्तकांची जाडी वाढेल, विदयार्थ्यांना हाताळण्यास कठीण होईल अथवा बाइंडिंग मजबूत होणार नाही. या साऱ्या समस्या गृहित धरुन महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती

व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी संपूर्ण अभ्यासक्रम एकत्रित असणारी पाठयपुस्तिका तीन भागात विभागली आहे.

## एकात्मिक व द्विभाषिक पाठयपुस्तकांचे उपयोगित्व

* दप्तराचे ओझे कमी झाले आहे.

* एका इयत्तेला असलेली सर्व विषयांची पुस्तके एकाच पाठयपुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहेत.

* एकात्मिक पाठयपुस्तकाचे एकूण तीन भागात विभाजन करण्यात आले आहे.

* तीन भागात विभागल्यामुळे क्रमीक पुस्तक आकाराने लहान व सुटसुटीत झाले आहे.

* वर्गाला एकच पुस्तिका असल्याने विदयार्थ्यांना सांभाळण्यास सहज झाले.

* पाठयपुस्तकांचा एक भाग साधारण: तीन महिन्यात पूर्ण करावायाचा आहे.

* शिक्षकांना वार्षिक व मासिक नियोजन करणे सोपे जाईल.

* दर तीन महिन्यानंतर नविन पाठयपुस्तक मुलांच्या हाती पडणार म्हंटल्यावर मुलांनाही हा बदल आवडेल व नविन पुस्तिका हाताळताना उत्सुकता वाढेल.

* एकात्मिक पाठयपुस्तिका ही द्विभाषिक करण्यात आली आहे.

* द्विभाषिक पाठयपुस्तक करताना गणित व विज्ञान या विषयांत येणाऱ्या पुस्तिकेत मराठी शब्दांसोबत पर्यायी इंग्रजी शब्द देण्यात आले आहेत. (उदा. भौमितीक आकृत्यांची ओळख या पाठात Quadrilateral, Triangles, Circles) असे इंग्रजी शब्द वापरण्यात आले आहेत.

* भविष्यात विदयार्थ्यांना विज्ञान विषयात उच्च शिक्षण घ्यावयाचे असल्यास त्याची पूर्वतयारी प्राथमिक शिक्षणापासूनच होईल.

* पालकांचा सेमीकडे वाढता कल पाहता द्विभाषिक पुस्तिका उपयुक्त ठरेल.

एकंदरित पाहता हा ओझ्याविना शिक्षणाचा पथदर्शी प्रकल्प स्वागतार्ह आहे व शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती मंडळ यांचे हे पथदर्शी पाऊल देशाला दिशादर्शक ठरेल.

**नांदेड जिल्हा व त्यातील हदगांव तालुका जेथे नेहमीच उपक्रमांची रेलचेल असलेल्या तालुक्याची निवड यासाठी व्हावी ही बाब भूषणावह आहे.**

एकात्मिक व द्विभाषिक पाठयपुस्तक योजनेचे फलित विदयार्थी, शिक्षक, पालक व पर्यायाने समाजाला नक्कीच चांगले मिळेल व अध्ययन अध्यापन अधिक सुकर व प्रभावी होण्यास मदत होईल.



**श्री. धोबे सुनिल गंगाधर**
प्राथमिक शिक्षक
जिल्हा परिषद नांदेड
मो.9421948864

# विचार बदला, देश बदलेल

श्री. नागोराव सा. येवतीकर
विषयशिक्षक
जि.प.प्रा. कन्या शाळा धर्माबाद
ता. धर्माबाद जि.नांदेड
मो. 9423625769

15 ऑगस्ट 1947 रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य झाला. ह्या सोनेरी दिवसाची पहाट पाहण्यासाठी कित्येक लोकांना आपले प्राण गमवावे लागले. आजच्या दिवशी आपण ह्या सर्व थोर क्रांतिकारक आणि महात्मा मंडळीची आठवण करतो.



"भारतमाता की जय" असा नारा देतांना त्या छोट्याशा शिरीषकुमारची आठवण आल्याशिवाय राहत नाही. तो शाळकरी वयाचा म्हणजे जेमतेम 10 वर्षाचा होता. इंग्रजांचा विरोधात नारे दिल्यामुळे आणि भारतमातेची सेवा केल्यामुळे त्याला इंग्रजांनी ठार केले. परदेशी कपड्यांच्या गाडीसमोर स्वतःचे बलिदान करणारे बाबू गेनूला आपण कसे विसरू. शिरीषकुमार व बाबू गेनू आज आपल्यात नाहीत परंतु त्याच्या आठवणी, त्याचे कार्य अजूनही स्मरणात आहे. आपण ते कधीच विसरु शकत नाही.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या काळात लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, मौलाना अबुल कलाम आझाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर इत्यादी अनेक जणांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ उभी केली व देशाला गुलामगिरीतून मुक्त केले. त्यापूर्वी महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुणे येथील भिडेच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. समाजातील रूढी, परंपरा व सनातन पद्धतीच्या काळात फुले दाम्पत्याना खूप हालअपेष्टा सोसावे लागले. तरीही त्यानी न डगमगता शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्याचे महान काम केले त्यास्तव शैक्षणिक क्षेत्रातील त्याचे कार्य विसरून चालणार नाही.

हिंदवी स्वराज्य निर्मितीसाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले हे तर लक्षात राहतेच शिवाय त्यांना घडविणारी राजमाता जिजाऊ यांची आठवण पदोपदी येत राहते. सहा महिन्यांचे तान्हे बाळ पाठीशी बांधून इंग्रज लोकांशी दोन हात करणारी आणि मेरी झाँसी नहीं दूँगी अशी ठणकावून सांगणारी राणी लक्ष्मीबाईचे शौर्य आमच्यासाठी नेहमीच प्रेरणा देत राहील. गरीब व अनाथांची आई मदर तेरेसा हे त्यांच्या अविरत सेवेमुळे कायम स्मरणात राहतात. या सर्वच लोकाना जाऊन इतकी वर्षे झाली तरी त्यांचे नाव आपण स्मरणात ठेवतो, आठवण करतो, त्यांना विसरत नाही. कारण त्यानी कामाच असे केले आहे की त्यास कोणीच विसरू शकत नाही यालाच म्हणतात मरावे परी कीर्तीरूपे उरावे.

आपणाला सुद्धा असेच काही लोकांच्या आठवणीत, स्मरणात रहावे असे कार्य करणे गरजेचे आहे. तसा निर्धार आपण करायला हवे. प्रसिद्ध विचारवंत साईरस म्हणतो की,'कीर्ती मिळविण्यासाठी चांगल्या प्रकारची पुष्कळ कामे करावी लागतात; मात्र अपकिर्ती होण्यासाठी एक वाईट काम पुरेसे असते'. अनेक लोक जन्मतात आणि किती तरी लोक रोज मरण पावतात. परंतु ज्यांनी समाजाच्या उपयोगी पडेल असे काम केले आहे त्यांचीच समाजामध्ये कीर्ती आणि नाव शिल्लक राहते. स्वतःसाठी किंवा स्वतःच्या कुटुंबासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या व धडपडणाऱ्या व्यक्तीला त्याच्या कुटुंबातील सदस्यच तेवढे लक्षात ठेवू शकतात. त्यामुळे हेन्नी एस. सटन यांनी म्हटल्याप्रमाणे' कीर्ती मिळवायचे असेल तर दुसऱ्याचे अश्रू पुसण्याचे प्रयत्न करा'. आपण जेंव्हा इतरांचे दुःख समजून घेऊन त्याना हातभार किंवा दिलासा देतो तेंव्हा त्याच्या मनात आपल्याविषयी करुणा, प्रेम, माया आणि ममतेची भावना निर्माण होते आणि नक्कीच आपली कीर्ती होते. या जगात आपण रिकाम्या हाताने आलोत आणि रिकाम्या हातानेच परत जाणार आहोत ही जगज्जेता सिकंदराची शिकवण विसरून चालणार नाही.

आपण खुप नशीबवान आहोत की स्वातंत्रोत्तर काळात आपला जन्म झाला. गुलामगिरी म्हणजे काय असते याची जरा सुध्दा आपणास जाणीव झाली नाही. आपण स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास फक्त पुस्तकातून वाचन करतो आणि तेच लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करतो. कधी कधी तर अमुक तारीख आणि अमुक व्यक्ती माझ्या लक्षात राहतच नाही असे ही बोलून जातो. जुलमी इंग्रजांच्या गुलामगिरीत लोकांनी काय हालअपेष्ट सहन केल्या असतील ? त्यांचा इतिहास वाचूनच अंगावर काटा उभा राहतो. सुखदेव, राजगुरु आणि भगतसिंग यांची नावे ऐकली की मनात स्फूर्ती निर्माण होते. भारतमाता की जय म्हटल्यामुळे शाळकरी शिरीषकुमारला इंग्रजांनी गोळ्या झाडल्या आणि आज आमच्या तोंडातुन भारतमाता की जय बारीक आवाजात निघतो. कारण आपणाला स्वातंत्र्य

फुकटात मिळालेले आहे. त्यामुळे त्याचे आपणास काही एक किंमत नाही. म्हणतात की फुकटच्या वस्तूची किंमत विकत घेतल्याशिवाय कळत नाही.

आज आपणास प्रत्येक गोष्टीचे स्वातंत्र्य आहे. इंग्रज लोक भारतातून निघून जाऊन 73 वर्षाचा काळ गेला. या 73 वर्षात भारताने लक्षणीय प्रगती केली नाही हे जरी सत्य असले, तरी संपूर्ण जग भारत देशाकडे विकसनशील देश या नजरेतून पाहते. आज भारतात मनुष्यबळ तर आहेच शिवाय बुद्धिमान लोकांची संख्या सुध्दा भरपूर आहे. त्यामुळे जग आपल्याकडे बुद्धिमान व हुशार युवकांचा पुरवठा करणारा देश म्हणून पाहतो. आपल्या देशात युवकासाठी रोजगार नाहीत म्हणून होणारी ओरड सर्वत्र आहे. विदेशात काय रोजगार मोठ्या प्रमाणावर आहेत काय? अर्थात या प्रश्नाचे उत्तर सुध्दा नाही, असेच मिळणार. सर्वांना रोजगार मिळत नाही जो यासाठी पात्र असेल, ज्याच्या जवळ बुद्धिमत्ता आहे त्याला जगात कोठेही रोजगार मिळेल यात शंका नाही. परंतु स्वातंत्र्य जसे फुकट मिळाले तसे सर्व काही फुकट मिळाल्यास जीवन सुखी होईल, असे स्वप्न रंगविणारे युवक देशाच्या प्रगतीत काय हातभार लावतील ? ते फक्त रडण्याचे काम करतील. कारण त्यांना आयती खायची सवय लागली. युवकांच्या हाताला काम मिळणे आवश्यक आहे. तसा युवकांनी देखील स्वत: प्रयत्न करणे गरजेचे आहे.

देशाने आपणास खुप काही दिले याची एकदा जाणीव निर्माण करा. आपल्या देशाची प्रगती करणे आपल्या हातात आहे. कधी तरी आपल्या स्वतःपुरता विचार करणे बाजूला ठेवून, कोण आपणास काय दिले यापेक्षा मी देशासाठी काय केलो याची एकदा तरी गोळाबेरीज आपण केली आहे काय ? ज्याप्रकारे मिसाईल मॅन तथा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी म्हटले आहे की, देशाला देण्यासाठी तुमच्याकडे दहा मिनिटे वेळ आहे काय? हा प्रश्न सर्वांनी आपल्या स्वतःच्या मनाला दिवसातुन एकदा तरी विचारावा. देशाच्या सेवेसाठी माझे योगदान काय आहे ? याचा विचार आपण करणे आवश्यक आहे. जन्म देणारी आई आणि ज्या भूमीवर आपण जन्म घेतला ती भारतमाता अश्या दोन माता प्रत्येकाच्या जीवनात असतात. म्हणूनच प्रसिद्ध गझलकार सुरेश भट म्हणतात की, गे माय भू तुझे मी फेडीन पांग सारे, आणीन आरतीला, चंद्र सूर्य तारे. याप्रकारे आपण जन्मदात्री आईची सेवा मनापासून करतो तसे भारत मातेची सुद्धा सेवा करणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहेत. सीमारेषेवर डोळ्यात तेल घालून देशाचे संरक्षण करणारे सैनिकच फक्त देश सेवा करीत नाहीत, तर आपण सुद्धा आपापल्या परीने देशाची सेवा करू शकतो. सैनिक लोकांमध्ये ज्याप्रकारे देशभक्ती निर्माण केल्या जाते तसे इतर नागरिकांमध्ये सुद्धा निर्माण होणे अत्यावश्यक आहे. आपण ज्या देशात राहतो त्या देशाने तयार केलेल्या घटनेनुसार आपणास वागावे लागते. त्याविरुद्ध वागलो तर

निश्चितपणे आपण काहीतरी चूक करीत आहोत किंवा गुन्हा घडत आहे असे वाटते. नियमाचे उल्लंघन न करता प्रामाणिकपणे वागणे यातून एक प्रकारे देशसेवाच घडते.

आपले कर्तव्य आपण न विसरता काम करीत राहिलो तर त्यातून देशाची सेवा घडते. प्रत्येकांनी आपल्या देशाचे नाव उज्ज्वल व्हावे म्हणून प्रामाणिकपणे कार्य करायला हवे. सरकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या कामात कुचराई न करता काम करणे गरजेचे आहे. राजकारणी लोकांनी जनतेचे कल्याण आणि विकास होईल असे काम केल्यास ती खरी देशसेवा ठरेल. व्यापारी मंडळींनी आपल्या व्यवहारात शुद्ध व्यवहार ठेवल्यास आपल्या व्यापाराची कीर्ती होईल आणि देशाचे नाव होईल. खेळाडू तर आपल्या खेळाद्वारे देशाचे नाव जगभर पोहोचवत देशाची सेवा करत असतात.

आज देशामध्ये सर्वत्र भ्रष्टाचार फोफावला आहे. अमुक ठिकाणी लाच घेताना कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली, अश्या बातम्या रोज निदान एकदा तरी वाचायला मिळते. जे लोक अधिक पैसा मिळविण्याच्या दृष्टीने किंवा लवकरात लवकर श्रीमंत व्हावे या उद्देशाने सामान्य नागरिकांना पैशाचा तगादा लावतात. लाच दिल्याशिवाय काम पूर्ण करीत नाहीत, अशी मंडळी देशसेवा करतात काय? जेव्हा त्यांना अटक झाल्याची बातमी बाहेर येते तेव्हा त्यांच्या संपूर्ण परिवाराची बदनामी होते. ते ज्या विभागात काम करतात त्या विभागाची सुद्धा नाचक्की होते. ज्या गावात किंवा तालुक्यात ते काम करतात त्या गावाचे वा तालुक्याचे नाव देखील खराब होते. ज्या ठिकाणी आपल्यावर डाग लागतो त्या ठिकाणी आपण आपल्याशी जोडलेल्या सर्वच घटकावर डाग लागतोच लागतो. याद्वारे आपली देशसेवा होते का? भ्रष्टाचार करण्यापूर्वी प्रत्येक व्यक्तीने याविषयी एकदा तरी विचार करावा. प्रत्येकजण या दृष्टिकोनातून विचार केल्यास भारतात भ्रष्टाचार संपवायला वेळ लागणार नाही. जगात भारताला घोटाळ्याचा देश असे म्हटले जाते.

प्रत्येक भारतीय नागरिकांनी आपले कर्तव्य पूर्ण करीत जनतेचे काम केल्यास ते एक प्रकारे देशसेवाच ठरेल असे वाटते. आपण जर एका वेगळ्या दिशेने विचार केलो तर आपणास पुढील तीस वर्षात नक्कीच वेगळा भारत दिसेल ज्यावेळी आपण सर्व आपल्या भारतीय स्वातंत्र्याची शतकी साजरी करू. आपले विचार बदला देश आपोआप बदलेल. देशाला बदलण्याच्या काळजीत आम्हीच बदलायला तयार नाही.

(लेखक नांदेड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक कन्या शाळा धर्माबाद येथे विषय शिक्षक पदावर कार्यरत आहेत.)



***श्री. नागोराव सा. येवतीकर***
*विषयशिक्षक*
*जि.प.प्रा. कन्या शाळा धर्माबाद*
*ता. धर्माबाद जि.नांदेड*
*मो. 9423625769*

# विभाग क
# विदयार्थ्यांचे लेख व कविता

# विदयार्थ्यांनी पाठवलेल्या गोष्टी

## लोभी कुत्रा

एका गावात एक छोटास कुत्रा राहत होता. तो गावात राहूनच मोठा झाला. गावात इकडे तिकडे फिरुन काही खायला मिळते का ते पहायचा व त्या मिळालेल्या भाकरीच्या तुकडयावर गुजरान करायचा.

एकेदिवशी त्याला एक भाकरी मिळाली. तो ती तोंडात घेऊन गावाच्या बाहेर जाऊ लागला. जाताना तो एका पुलावर आला. त्याने पुलावरुन खाली पाहिले त्याला तिथे अजून एक कुत्रा दिसला व त्याच्या तोंडातही भाकरी दिसली. त्याने त्या कुत्र्याला भिती घालून त्याची भाकरी हडप करायचे ठरवले. व तो जोरजोराने भुंकू लागला.

भुंकण्यासाठी त्याने तोंड उघडताच त्याच्या तोंडात जी भाकरी होती ती पण पाण्यात पडली तो निराश झाला.

**तात्पर्य - जास्तीचा लोभ कधी करु नये**.

नंदिनी सुमेध वाघमारे
वर्ग - सातवा
जि.प.प्रा.शाळा शिबदरा म

## सिंह आणि उंदिर

एकदा एका जंगलात एक सिंह राहत होता तो आपल्या गुहेत शांत झोपला होता. सिंह झोपलेला पाहून त्याच्या गुहे शेजारीच एक उंदराचे बिळ होते तेथून एक इटूकला उंदीर बाहेर आला व तो सिंहाच्या अंगावर नाचू लागला उडया मारू लागला.

उंदराला खूपच छान वाटू लागले तो अजून जोरजोराने उडया मारु लागला यामुळे सिंहाची झोप मोड झाली. सिंहाने लगेच त्या उंदराला आपल्या पंजात पकडले. तो उंदीर गयावया करु लागला. सोडून देण्यासाठी प्रार्थना करु लागला. व सिंह महाराज आपण जर कधी संकटात पडलात तर मी तुम्हाला मदत करीन असे आश्वासन देऊ लागला.

हे ऐकून सिंह म्हणाला तु इवलासा प्राणी माझी काय मदत करणार ? असे म्हणून सिंहाने उंदराला सोडून दिले.

एकदा एका शिकाऱ्याने जाळे टाकले व त्या सिंहाला पकडले. सिंह जोरजोरात जाळयात ओरडू लागला. उंदीराने त्या सिंहाचा आवाज ओळखला. तो धावतच सिंहाच्या मदतीला आला. उंदराने

# विदयार्थ्यांनी पाठवलेल्या गोष्टी

त्या सिंहाचे जे जाळे होते ते सर्व कुरतडून कुरतडून तोडून टाकले. व सिंहाला मोकळे केले. व सांगितले मी माझे वचन पूर्ण केले.

**तात्पर्य - व्यक्ती छोटी असो किंवा मोठी ती कधी न कधी उपयोगाला येत असते**.

सानिका पवार
वर्ग सातवा
जि.प.प्रा.शा. करमोडी ता. हदगांव

**माझा आवडता सण पोळा**

गावामध्ये खूप वेगवेगळे सण साजरे केले जातात. पण मला पोळा हा सण फार आवडतो. कारण हा सण शेतक-यांचा मित्र कष्टकरी बैलाची पूजा व सन्मान करायचा सण आहे.

या दिवशी सर्व शेतकरी आपल्या बैलाला नदीवर पाण्याने स्वच्छ आंघोळ घालतात. बैलाला सजवतात. त्यांच्या अंगावर वेगवेगळया रंगाच्या झूल पांघरल्या जातात. शिंगांना रंग लावून बाशिंगे बांधीली जातातत.

सायंकाळी मंदिराजवळ आणून त्याच्या फेऱ्या मारतात. व पुरणपोळीचा निवद खाऊ घालतात. बैल आहेत म्हणून शेतकऱ्यांना शेतीची कामे करता येतात. व आपल्या सर्वांना अन्नधान्य मिळते.

मला पोळा हा सण खूप आवडतो.

श्रीकांत प्रभाकर तुपकरी
वर्ग - सहावा
जि.प.प्रा.शाळा शिबदरा म

# विभाग ड

# इतर

# नियमित प्रसिदध

# होणारे सदर

# बालचित्रकला




श्रुती अरुण पुंडे
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रुई
ता. हदगांव जि. नांदेड

# दिनविशेष

| | |
|---|---|
| दिनांक १ ऑगस्ट - | अण्णाभाऊ साठे जयंती, लो. टिळक पुण्यतिथी, असहकार चळवळ दिन |
| दिनांक २ ऑगस्ट - | अलेक्झांडर ग्रॅहम बेल पुण्यतिथी |
| दिनांक ३ ऑगस्ट - | क्रांतिसिंह नाना पाटील जयंती, आंतरराष्ट्रीय मैत्री दिवस |
| दिनांक ४ ऑगस्ट - | संत तुलसीदास जयंती, नागपूर विदयापीठाची स्थापना |
| दिनांक ५ ऑगस्ट - | राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण दिन |
| दिनांक ६ ऑगस्ट - | जागतिक शांतता दिन, हिरोशिमा दिन, अणुबॉम्ब निषेध दिवस |
| दिनांक ७ ऑगस्ट - | रविंद्रनाथ टागोर पुण्यतिथी |
| दिनांक ९ ऑगस्ट - | ऑगस्ट क्रांतिदिवस, नागासाकी दिवस |
| दिनांक ११ ऑगस्ट - | खुदिराम बोस बलिदान दिवस, मादाम कामा पुण्यतिथी |
| दिनांक १२ ऑगस्ट - | संस्कृत दिवस, विक्रम साराभाई जन्मदिन, पहिली जागतिक मराठी परिषद |
| दिनांक १३ ऑगस्ट - | अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी |
| दिनांक १५ ऑगस्ट - | भारतीय स्वातंत्र्य दिन, रामकृष्ण परमहंस पुण्यतिथी |
| दिनांक १६ ऑगस्ट - | वीराचार्य बाबासाहेब कचनुर पुण्यतिथी, संत रोहिदास स्मृतिदिन |
| दिनांक १८ ऑगस्ट - | नेताजी सुभाषचंद्र बोस पुण्यतिथी, विश्व भूमिपुत्र दिन |
| दिनांक १९ ऑगस्ट - | फ्रेंच गणितज्ञ पास्कलची पुण्यतिथी, जेम्स वॅट स्मृतीदिन |
| दिनांक २० ऑगस्ट - | लोकशक्ती दिन, सदभावना दिन, राजीव गांधी जयंती |
| दिनांक २३ ऑगस्ट - | मराठवाडा विदयापीठाचा प्रारंभ, कवी विंदा करंदीकर जन्मदिन |
| दिनांक २६ ऑगस्ट - | नाटयचार्य कृ.प्र. खाडीलकर स्मृतिदिन |
| दिनांक २७ ऑगस्ट - | क्रिकेटवीर डॉन ब्रॅडमन यांचा जन्मदिन |
| दिनांक २८ ऑगस्ट - | सरखेल कान्होजी आंग्रे स्मृतिदिन |
| दिनांक २९ ऑगस्ट - | हॉकी जादूगार ध्यानचंद यांचा जन्मदिन |
| दिनांक ३० ऑगस्ट - | नारायणराव पेशव्यांचा जन्म, इन्सॅट १ बी उपग्रह अवकाशात सोडला. |
| दिनांक ३१ ऑगस्ट - | ताराबाई मोडक स्मृतिदिन |

संकलन - इंटरनेट वरुन साभार...

# निवडक
# बोधकथा / संस्कारकथा

## जिभेवरील शब्द

एक बांगड्या विकणारे काका होते. गावोगावी फिरून बांगड्या विकायचे. त्यांच्याकडं एक मोठी बांबूची टोपली होती. टोपली डोक्यावर घेऊन इकडून तिकडे जायचे. त्यामध्ये ते बांगड्या अशा पद्धतीने रचायचे की वरचे कापड काढल्यावर सर्व प्रकारच्या बांगड्या ग्राहकांना दिसायच्या. हळूहळू बांगड्यांची विविधता वाढू लागली आणि टोपलीचा आकार वाढू लागला. आता सगळी विविधता त्या टोपलीत मावेना म्हणून त्यांनी एक गाढवी विकत घेतली.

त्यांनी त्या गाढवीचे नाव राणी ठेवले.

तिच्या पाठीवर ठेवता येईल अशी रचना बांगडयांची बनवली. बांगडीवाले काका आणि राणी नाव ठेवलेली त्यांची गाढवी गावोगावी फिरताना दिसू लागले. यामध्ये असलेला सर्वात गमतीचा भाग म्हणजे काकांचे राणीशी चाललेले संभाषण. पुढे दगड दिसला तर ते म्हणायचे, "राणी बेटी, पुढे दगड आहे, थोडे बाजूने चाल."

कधी ती खूपच हळू चालू लागली तर म्हणायचे," अग राणी, थोडे लवकर पाय उचल, गावोगावी माझ्या मुली माझी वाट पाहत आहेत." राणी कधी वेगाने जाऊ लागली, जे फारच क्वचित व्हायचे तर म्हणायचे," काय बेटी, आज काय हरीण झालीस का? जरा जपून पाय टाक. बांगड्या फुटतील ना!" ते इतक्या प्रेमाने गाढवीशी बोलतात ते काय गाढवीला कळत असेल का याचे आश्चर्य सर्वांना वाटायचे.

एक दिवस एका आजीने त्यांना असे बोलत चालताना पाहिले आणि विचारले, " बाकीचे जे लोक गाढव पाळतात, ते हातात काठी ठेवतात, अधूनमधून गाढवाला मारतात, हे आम्ही पाहिले आहे पण गाढवीला राणी बेटी म्हणणारे, तुम्ही पहिलेच दिसता. असे कसे काय?"

" आजी, तुम्हाला सांगू का? माझा व्यवसाय आहे बांगड्या विकण्याचा आणि भरण्याचा. माझा संबंध येतो मुली आणि बायकांशी. मी जर राणीला गाढवी म्हणायला लागलो, शिव्या द्यायला लागलो तर माझ्या तोंडात तेच शब्द बसतील. एकदा कुठलाही शब्द आपल्या जिभेवर बसला तर अनवधानाने तो कधी बाहेर येईल हे सांगता येत नाही. मग बांगड्या विकताना चुकून असे शब्द माझ्या तोंडातून बाहेर पडतील. मी चुकून असा शब्द गावातल्या मुलींशी, सूनांशी बोललो तर गावकरी माझे काय करतील? म्हणून मी माझ्या तोंडातून कधीच चुकीचा शब्द येवू देत नाही. माझ्या जिभेला अशा शब्दांची सवयच लागू देत नाही."

**तात्पर्य :- माणसाने नेहमी चांगले बोलण्याची सवय ठेवावी म्हणजे ऐनवेळी आपल्या हातून चूक घडत नाही.**

# ओळख थोर विभूतींची...

लेखमाला क्र.०२

## क्रांतिसिंह नाना पाटील

### प्रतिसरकारचे प्रणेते

**जन्म** : ०३-०८-१९००  **मृत्यू** : ०६-१२-१९७६

क्रांतिसिंह नाना पाटील यांचे पूर्ण नांव नाना रामचंद्र पाटील असे होते. त्यांचा जन्म दि. ३ ऑगस्ट १९०० रोजी सांगली जिल्हयातील एका छोटयाशा गावात झाला. त्यांनी भारत छोडो आंदोलनाच्या काळात खूप मोलाचे कार्य केलेले आहे.



भारत छोडो आंदोलनाच्या काळात पत्रीसरकारच्या माध्यमातून त्यांनी इंग्रज विरोधी कारवाया केल्यामुळे त्यांना पकडून आणणाऱ्यास अटक करुन आणणाऱ्यास ब्रिटीश सरकाने दहा हजार रुपये इनाम जाहिर केला होता. या अशा झुंजार क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात आजही अभिमानाने घेतले जाते.

सांगली जिल्हयातील येडेमच्छिंद्र या गावी जन्मास आलेल्या नाना पाटलांनी प्राथमिक शिक्षण घेऊन कोल्हापूर व सातारा या विभागात सत्यशोधक चळवळींचे प्रभाव क्षेत्र वाढविले. म. गांधीजींच्या असहकार चळवळींचे त्यांनी उत्साहाने स्वागत केले. ते प्रांतिक काँगेस मध्ये धडाडीचे कार्यकर्ते म्हणून गणले जात. १९४२ च्या आंदोलनात त्यांनी विशेष कार्य करुन दाखविले. त्यांनी ब्रिटीशांना सळो की पळो करुन सोडले परंतू त्याहीपेक्षा ब्रिटीशांना हेरगिरी करणाऱ्या पोलिस पाटील, तलाठी यांना प्रतिबंध घालण्यासठी प्रतिसरकार स्थापून त्यांचा योग्य न्याय निवाडा करत असत. भारताला पुढे चालून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते लोकसभेवर निवडून गेले. लोकसभेवर गेल्यावर आपल्या महाराष्ट्रीय मराठी भाषेचा तडफदारपणा त्यांनी दिल्लीला दाखवून दिला. एक सच्चा देशभक्त मराठी माणूस म्हणून आजही महाराष्ट्राच्याच नव्हेतर देशाच्या इतिहासात त्यांचे नाव घेतले जाते.

# म्हणी ओळखा...

## म्हणी ओळखा चाचणी क्रं. ०२

दिलेल्या शब्दांना योग्य क्रमाने लावून अर्थ पूर्ण म्हण तयार करा.

१) न आ तू फु त गी फा टया

२) ठो ओ टो बा म धी ग वि पा बा

३) ण थ हू न पा य प स अं रा पा वे रु

४) ळा ऊ को ह दे ळा का व ढ णे आ न

५) ळा य त्या त गो बा आ बि ना

(उत्तरे पुढील अंकात)

म्हणी ओळखा

चाचणी क्र. १ ची उत्तरे

१) अति तेथे माती

२) अति शहाणा त्याचा बैल रिकामा

३) अडला हरी गाढवाचे पाय धरी


४) असतील शिते, तर जमतील भुते

५) आग सोमेश्वरी, बंब रामेश्वरी

# Yes ....... मी सोडवणार S शब्दकोडं..

निर्मिती
श्री. श्यामसुंदर सुपलकर
सहशिक्षक

## शब्दकोडे क्रमांक ०२




उत्तरे अर्थातच पुढील अंकात...

### शब्दकोडे संदर्भाने महत्वाची सूचना

दिलेले शब्द कोडे सोडवण्यासाठी खाली दिलेले शब्द / प्रश्न नीट पहा. प्रश्नांचे क्रमांक अचूक पाहून त्या प्रमाणे विचारलेल्या शब्दाचे समान अर्थ असणारे शब्द किंवा विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तर्क लावून शोधावे. सदर शब्द कोडे याच कागदाची प्रिंट काढून अथवा वेगळया कागदावर याप्रमाणे चौकोन आखून सोडवावे. व आपल्या वर्गशिक्षकांना / मुख्याध्यापकांना दाखवावे. यशस्वी उत्तरे सोडविणा-या विदयार्थ्यांची नावे आपले वर्गशिक्षक आमच्याकडे पाठवतील ती पुढील अंकात प्रसिदध होतील.

**उभे शब्द**

१) एका मुलाचे नांव

४) एक डोळा,

**आडवे शब्द**

१) देऊळ, प्रार्थनास्थळ

२) सी. व्ही. ------- एक थोर शास्त्रज्ञ यांचे नांव

३) घर, गृह, निवासस्थान

### मागील शब्दकोडे क्र.01 चे उत्तर

| | | |
|---|---|---|
| म | क | र |
| हा | | |
| न | व | रा |
| | | गी |
| रा | क | ट |

# चित्रशब्दकोडे

निर्मिती : सुपलकर एस.बी.

विदयार्थी मित्रांनो नमस्कार.. हे एक चित्रशब्दकोडे आहे. यात काही चित्रे दिलेली आहेत. ती चित्रे तुम्ही नीट निरीक्षण करुन पहावी व त्या चित्रांचे नाव या शब्दकोडयात लिहावे. कोडे वेगळया कागदावर सोडवले तरी चालेल सदरील कोडे सोडवून तुम्ही तुमच्या वर्गशिक्षक / मुख्याध्यापकांना दाखवावे. तुमचे सर अचूक सोडविलेल्या विदयार्थ्यांची नावे आमच्याकडे पाठवतील. ती पुढील अंकात समाविष्ट होतील.

## चित्रशब्दकोडे क्र ०२

न


दी


व

















## चित्रशब्दकोडे क्र 01 चे उत्तर व यशस्वी स्पर्धकांची नावे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | दो | | | |
| वा | रा | | | |
| र | | | | |
| क | बू | त | र | |
| री | | ल | | |
| | | वा | जं | त्री |
| दु | पा | र | | को |
| | | | | ण |


# चित्र रंगवा..

सदरील चित्राची प्रिंट काढून छान रंगवा व तुमच्या वर्गशिक्षकांना / मुख्याध्यापकांना दाखवा.

विदयार्थ्याचे नांव :-

र्वग :-

शाळा :-



# मार्ग शोधा...

सदरील चित्राची प्रिंट काढून मार्ग शोधा व तुमच्या वर्गशिक्षकांना / मुख्याध्यापकांना दाखवा.

विदयार्थ्याचे नांव :-

र्वग :-

शाळा :-



# दोन चित्रांतील फरक ओळखा..

सदरील दोन चित्राचे बारकाईने निरीक्षण करुन फरक ओळखा तुमच्या वर्गशिक्षकांना / मुख्याध्यापकांना दाखवा.

## चित्रांतील फरक ओळखा क्र.०२






# Math Puzzle For Brain

सदरील गणितातील मूलभूत क्रियांवर आधारित कोडे Math Puzzle तुमच्या तर्कशक्तीच्या आधारे सोडवा व नंतर तुमच्या वर्गशिक्षकांना / मुख्याध्यापकांना दाखवून तपासून घ्या.

सदर कोडे सोडविताना वरील रकान्यात ज्या संख्या व चिन्हे उदा. - + X = 0 1 2 3 4 5 6 7 8 9 दिलेले आहेत ते खालील कोडयातील रिकाम्या चौकोनात वापरा व कोडे पूर्ण करा.

## Picure Puzzle For Brain No 02

विदयार्थ्याचे नांव :-
वर्ग :-
शाळा :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 2 | - | 3 | = | 10 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 10 | | | |
| | 5 | X | | | |
| | | | | | |
| | | = | | | |
| 17 | = | 20 | | | |

उत्तरे अर्थातच पूढील अंकात

# Picture Puzzle For Brain

सदरील गणितातील मूलभूत क्रियांवर आधारित कोडे Puzzle तुमच्या तर्कशक्तीच्या आधारे सोडवा व नंतर तुमच्या वर्गशिक्षकांना / मुख्याध्यापकांना दाखवून तपासून घ्या.

*Picture Puzzle For Brain No 02*

विदयार्थ्याचे नांव :-

वर्ग :-

शाळा :-







# ठिपके / अंक जोडा व चित्र पूर्ण करा.

सदरील पृष्ठाची प्रिंट काढा. सूचनेप्रमाणे ठिपके अंक जोडा व चित्र पूर्ण करावे व तुमच्या वर्गशिक्षकांना / मुख्याध्यापकांना दाखवा.

## ठिपके / अंक जोडा व चित्र पूर्ण करा. क्र ०२

**विदयार्थ्याचे नांव :-**
**र्वग :-**
**शाळा :-**



# सुवचन / सुविचार..


पुस्तके आणि चांगली माणसं
लगेच कळत नाहीत,
त्यांना वाचावं लागतं.


मराठी सुविचार
"प्रत्येक बाबतीत दुसऱ्याचं
अनुकरण करु नका; स्वत:ची वेगळी
ओळख निर्माण करा."
www.Marathi-Suvichar.com


समुद्र ओलांडायचा असेल तर
फक्त किनाऱ्यावर उभं राहून
पाण्याकडे पाहत राहणं पुरेसं नाही.
- रवींद्रनाथ टागोर


॥ सुविचार ॥
गरज नसलेल्या वस्तू खरेदी
केल्यास गरजेच्या वस्तू
विकायची वेळ येते.


"जीवनात अनंत अडचणी
असतात,पण ओठांवर हास्य ठेवा,
कारण...कोणत्याही परिस्थितीत
जगायचं तर असतंच.
मग हसत हसत जगण्यात काय
नुकसान आहे...."
शुभ सकाळ MarathiSuvichar.in


अतिशय सुंदर
पाण्याने भरलेल्या तलावात...
मासे किड्यांना खातात,...
तर तोच तलाव कोरडा झाल्यास
किडे माश्यांना खातात...
संधी सगळ्यांना मिळते...
फक्त आपली वेळ येण्याची वाट पहा.
goodmorningimagesquotes.com

# पत्रास कारण की.....

पत्र क्र 00000

मित्रांनो नमस्कार,

या अंकापासून हे सदर नियमित सुरु झालेले आहे. या सदराच्या नावावरुन तुम्हाला अंदाज आलाच असेल की हे सदर कशाचे आहे..

अगदी बरोबर...

तर हे सदर आपल्या प्रतिक्रियांचे आहे. आपल्याला हा अंक पाहिल्यानंतर, अंक वाचल्यानंतर काय वाटले ? अंकातील कोणती बाब जास्त आवडली? कोणत्या लेखकाचा लेख, कोणत्या कवीची कविता, कोणत्या बालचित्रकाराचे चित्र, रांगोळी इ आवडले त्याबददल तुम्हाला प्रतिक्रिया दयावयाची आहे.

प्रतिक्रिया देणे पण अगदी सोप्पं आहे. आपल्याला काही पत्र लिहून पोस्टाने पाठावायचे नाही.. फक्त टेक्स SMS करुन व्हॉटसअप वर पाठवायचा आहे.

SMS पाठविताना मात्र या ***पत्रास कारण की.....*** या आपल्या सदराचा स्पष्ट उल्लेख करावा... आपले पत्र पुढील अंकात समाविष्ट करण्यात येईल.

धन्यवाद....

पत्र क्र 00000

मित्रांनो नमस्कार,

या अंकापासून हे सदर नियमित सुरु झालेले आहे. या सदराच्या नावावरुन तुम्हाला अंदाज आलाच असेल की हे सदर कशाचे आहे..

अगदी बरोबर...

तर हे सदर आपल्या प्रतिक्रियांचे आहे. आपल्याला हा अंक पाहिल्यानंतर, अंक वाचल्यानंतर काय वाटले ? अंकातील कोणती बाब जास्त आवडली? कोणत्या लेखकाचा लेख, कोणत्या कवीची कविता, कोणत्या बालचित्रकाराचे चित्र, रांगोळी इ आवडले त्याबददल तुम्हाला प्रतिक्रिया दयावयाची आहे.

प्रतिक्रिया देणे पण अगदी सोप्पं आहे. आपल्याला काही पत्र लिहून पोस्टाने पाठावायचे नाही.. फक्त टेक्स SMS करुन व्हॉटसअप वर पाठवायचा आहे.

SMS पाठविताना मात्र या ***पत्रास कारण की.....*** या आपल्या सदराचा स्पष्ट उल्लेख करावा... आपले पत्र पुढील अंकात समाविष्ट करण्यात येईल.

धन्यवाद....

# ज्ञानसंस्कार मासिक

शिक्षक बंधू आणि भगिनी यांना सादर नमस्कार..

आपल्या साठी घेऊन येत आहोत. सदर ज्ञानसंस्कार डिजीटल मासिक.... सदर मासिक दर महिन्याला तयार करुन ऑनलाईन pdf स्वरुपात आपल्या पर्यंत पोहोचविण्याचा मानस सुरु आहे.

आपले काही जुने लेख असतील तर ते आम्हाला पाठवू शकता.

तसेच आपण खालील विषयांवर पण लेख पाठवू शकता.

1. शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण बदल
2. अध्ययन अध्यापन व तंत्रज्ञान यांची सांगड
3. शिक्षक यांनी तयार केलेले नवोपक्रम
4. शिक्षकांनी केलेले शैक्षणिक साहित्य किंवा शाळा सुधारणेचे केलेले प्रयत्न
5. यशस्वी शाळांच्या यशोगाथा
6. यशस्वी विदयार्थ्यांच्या यशोगाथा
7. विविध कृतीशिल उपक्रम
8. ज्ञानरचनावाद यावर आधारित उपक्रम
9. प्रेरणादायी लेख कविता

10 विदयार्थ्यांची शिक्षकांची नेत्रदिपक कामगिरी

11. विविध शैक्षणिक बातम्या
12. शालेय सहशालेय घेतलेले उपक्रम
13. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन
14. विविध शासकीय विदयार्थी लाभाच्या योजना
15. विदयार्थ्यांसाठी रंजक विज्ञानपर माहिती

लेख साहित्य मर्यादा 300 ते 400 शब्द

(सदर साहित्य लेख कविता हे इंटरनेटवरुन कॉपी पेस्ट केलेले अथवा याआगोदर दुसरीकडे कोणाच्या नावे प्रसिदध झालेले नसावे. स्व निर्मित असावे.)

सदर साहित्य पाठवताना ms word मध्ये टाईप करुन ती फाईल email वर पाठवावी. किंवा व्हॉटसअप वर टाईप करुन पाठवावे. कागदावर लिहून फोटो पाठवू नये.

लेखासोबत लेखाच्या संदर्भात एक फोटो लेखकाचा एक पासपोर्ट फोटो, लेखकांचे संपूर्ण नांव, पदनाम , शाळा नांव (केंद्र तालुका जिल्हा सह) मोबाईल क्र. ई-मेल आयडी इ माहिती पाठवावी.

तसेच या शिवाय सदर मासिकात नियमित प्रसिदध होणारे सदर खालील प्रमाणे आहेत.

अ) शिक्षक वाढदिवस

ब) विदयार्थी वाढदिवस

क) बालचित्रकला

अर्थात विदयार्थ्यांनी स्वत: काढून रंगवलेले चित्र

ड) बालदोस्तांची रांगोळी

अर्थात विदयार्थ्यांनी स्वत: काढलेल्या रांगोळी

इ) सुंदर माझे हस्ताक्षर

सुंदर हस्ताक्षर असलेल्या वहीच्या पानाचा एकच फोटो शिक्षकांनी तपासूनच पाठवावा तो जसाच्या तसा चित्र स्वरुपात प्रसिदध होईल

फ) निवडक बोधकथा / संस्कारकथा दरमहा एक

ग) सामान्य ज्ञान /प्रश्नमंजूषा बहूपर्यायी 10 प्रश्न

इयत्ता 3 ते 8 वी साठी

ह) दिनविशेष

वरील अ ब क ड इ यांच्या पण स्पष्ट फोटो काढून वरील प्रमाणे ईमेल वर पाठवाव्यात.

फ ग ह हे साहित्य कागदावर लिहून प्रश्नमंजूषेचे उत्तरासहित वरील प्रमाणेच ई मेल किंवा whatsapp वर पाठवावे.

उत्तरे पुढील अंकात देण्यात येतील.

साहित्य पाठवण्यासाठी पत्ता

ईमेल आयडी dnyansanskar01@gmail.com

व्हॉटसअप क्रमांक 8380977961

श्री. सुपलकर एस बी.

नांदेड

डिजिटल ई मासिक

# ज्ञानसंस्कार

## तिमिरातुनी तेजाकडे.....

मागिल महिन्याचा अर्थात जुलै २०२० चा अंक
वाचण्यासाठी खालील लिंकवर क्लीक करा.

Google Drive https://drive.google.com/file/d/1001FDk4d4jBuyVSGI3AB_1RQclq-wVIr/view?usp=drivesdk

मागिल महिन्याचा अर्थात जुलै २०२० चा अंक
फिलपबुक स्वरुपात वाचण्यासाठी खालील लिंकवर क्लीक करा.

FlipBook https://online.fliphtml5.com/oqwln/ujec/

***श्री. सुपलकर एस. बी.***
***8380977961***
dnyansanskar01@gmail.com

## धन्यवाद

***पुन्हा भेटूया पुढील महिन्याच्या ई मासिकात.....***